स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१



# श्रीसाईवाक्सुधा

ग्रंथ वाचल्यानें आपला कार्यभाग साध्य होत नाहीं. जें वाचलें तें आपल्या कृतींत उतरलें पाहिजे. त्या ग्रंथांतील भावार्थांचा आपण निदिध्यास घेतला पाहिजे. तसें घडलें नाहीं तर पुस्तकीज्ञान व्यर्थ होय. तुम्हीं वेद वाचा, उपनिषदें वाचा, गीता वाचा किंवा रामायण, महाभारत वाचा जें आचरणांत येईल तेवढें तुमचें. बाकीचें त्या ग्रंथाचें. तें केवळ ग्रंथांत गडप होऊन रहायचें. तुम्हीं कोरडे पाषाण ! असें होतां कामा नये.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] डिसेंबर १९६६ [ अंक ९ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४२२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

आम्हीं मोठमोठ्या अध्यात्मिक ग्रंथांचें खूप वाचन करतों, दिवसांचे दिवस त्या वाचनांत घालवितों; परंतु त्याचें मनन करायचें, त्याचा निदिध्यास घ्यायचा, तें कांहीं आमच्याकडून घडत नाहीं. उपड्या घड्यावर पाणी! काय तें पाणी ओतल्याचा उपयोग? एका बाजूनें ओतलें आणि दुसऱ्या बाजूनें खालीं सांडून नाहींसें झालें. त्याचा कांहीं तरी उपयोग आहे का? तोच प्रकार बहुतेक सर्वांच्या बाबतींत घडत असतो.

**एका भक्ताची कथा**

साईबाबांनीं या बाबतींत एका भक्ताची जी कानउघाडणी केली तिचें प्रत्येकानें चिंतन करण्यासारखें आहे.

एकदां बेळगांवनजिकच्या वडगांवीं पुढील घटना घडून आली. तेथें जमीन मोजणी करण्याच्या हेतूनें एक गृहस्थ बरोबरच्या मंडळीसह गेले व तेथें त्यांनीं मुकाम ठोकला. त्या गांवीं एक सत्पुरुष रहात असत. ते मोजणीदार गृहस्थ देवभक्त होते. तुमच्या आमच्यासारखे! गांवांत सत्पुरुष आहेत हें समजतांच ते त्यांच्या दर्शनास गेले, त्यांच्याकडे जाऊन त्यांना साष्टांग प्रणिपात केला. नित्याप्रमाणें त्या सत्पुरुषानें आशीर्वाद दिला. मनाला बरें वाटलें. त्या सत्पुरुषांचे हातांत त्यावेळीं निश्चल दासकृत 'विचार-सागर' हा ग्रंथ होता. ते वाचीत होता. नमस्कार चमत्कार होऊन मोजणदार गृहस्थांनीं जातेवेळीं निरोप घेतला; तेव्हां ते म्हणाले, "हें पहा! माझ्या हातांत हा ग्रंथ आहे ना? याचें नांव लक्षांत ठेवून तो आपण वाचावा. तुमचे मनोरथ परिपूर्ण होतील हें विसरूं नका. पुढें मार्गे कामाच्या निमित्तानें तुम्हीं उत्तर दिशेला जाल त्यावेळीं तुमची नि एका महापुरुषाची भेट होईल. तशी भेट व्हायला भाग्य लागतें. परंतु तुमच्या भाग्यांत ती भेट आहे. तुमचें मन स्थीर नाहीं. ते महापुरुष पुढचा मार्ग तुम्हांला दाखावितील व तुमचे मन निःसंकोच होईल. त्यांच्या बोधामृतानें तुमच्या मनाला शांति मिळेल व तोच शाश्वत सुखसमाधानाचा मार्ग आहे.

**रेड्यावर स्वारी**

वडगांव येथील मोजणीचे कामकाज संपल्यावर त्यांना जुन्नर येथें जायचें होतें. तेथून जुन्नरला जायचें म्हणजे मार्गांतील बिकट असा नाणे नामक घांट चढून जावयाचें होतें. त्या घाटाची चढण फार बिकट आहे. आतां काय करायचें? तिकडे

जातांना रेड्यांचा उपयोग करीत असत. घोड्याऐवजीं रेडा ! रेड्यावर घालायचा खोगीर आणि त्यावर स्वार व्हायचें ! परंतु रेड्यावर स्वार झाल्यानंतर आदळत आपटत धक्के खात चढणें चढावी लागत असें. सर्वांग ठणकत असे. परंतु करणार काय? पायीं जाणें अशक्य; मग रेड्यांची शेपटी धरल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

त्यानीं भाड्यानें एक रेडा मिळविला व आपला प्रवास सुरू केला. खूप त्रासाचा प्रवास होता तो ! तो संपवून, स्वारी जुन्नर पेठेंत एकदांची दाखल झाली. तेथें जें कांहीं मोजणीचे कामकाज होतें ते ३।४ दिवसांत संपाविलें. इतक्यांत कल्याणला बदली झाल्याचा हुकूम हातीं पडला.

## हा पहा दैवयोग !

तेथून मोजणीदारास कल्याण येथें यावें लागले. दैवयोग कसा तो पहा. कल्याणला आले तर तेथें होते साईभक्त चांदोरकर. त्यांच्याकडून साईबाबांची थोरवी समजली; एवढेंच नव्हे तर ते म्हणालेही कीं, मी जातों आहे शिरडीला. तुम्हीं या माझ्याबरोबर. अनायासें बाबांच्या दर्शनाचा लाभ तुम्हांला होईल. चांदोरकरांनीं मनापासून सांगितलें. परंतु तें त्यांच्या मनांत शिरलें पाहिजे ना ? उगाच कसें बरें शिरेल. त्याला लागते तशीच पूर्वपुण्याई !

ज्या दिवशीं चांदोरकर कल्याण येथून निघायचे होते, त्याच दिवशीं त्या मोजणीदारांस ठाणें कोर्टांत एका फिर्यादीनिमित्त साक्षीसाठीं हजर रहायचें होतें.

मोठाच पेंचप्रसंग निर्माण झाला. इकडे आड तिकडे विहीर ! कोर्टाची तारीख चुकविली तर दंड होण्याची भीति ! बरं शिरडीला जाण्याची इच्छा व सोबत फार चांगली ! पोटार्थी माणूस ! नोकरी गेली तर ? ही मनांत चिंता !

## त्याची चिंता बाबांना

परंतु चांदोरकर त्यांना आश्वासनपूर्वक म्हणाल, "बाबारे ! त्याची तूं कांहीं-एक चिंता करूं नकोस. श्रद्धायुक्त अंतःकरणानें बाबांच्या दर्शनास ये. तेच तुझ्या चिंतेचें निवारण करतील. तो भार त्यांच्यावर सोपवून तूं मोकळा हो !

परंतु ते कसचे मोकळे व्हायला ? अंतःकरणांत तेवढी श्रद्धा हवी ना ? तें भांडवल कुठें होतें त्यांच्याजवळ ?

ते म्हणाले, "मनांत चिंतेचा भार ठेवून येणें आणि जाणे ! गोत्यांत सांपडायला होईल ! हें उरकतों एकदाचें काम आणि होतों मोकळा !"

"बाबा तुमची चिंता वहातील. ते तुम्हांला संकटांत मुळींच पाडणार नाहींत. तुम्हीं चला माझ्याबरोबर !" चांदोरकर म्हणाले.

### शेवटीं व्हायचें तें झालें

शेवटीं काय झालें ? जें व्हायचें तें झालें ! चांदोरकर ठरल्याप्रमाणें गेले शिरडीला आणि ते मोजणीदार गेले ठाण्याला, कोर्टांत हजर रहाण्यासाठीं.

तेथें काय वर्तले वर्तमान; तें आतां सावधान चित्तें ऐकावें आपण ! कोर्टांत काय घडलें ? त्या दिवशीं तो दावा कांहीं ना कांहीं कारणामुळें कोर्टापुढें येऊं शकला नाहीं. त्याची तारीख पुढें ढकलण्यांत आली !

शेवटीं झालें काय ? हेंही नाहीं आणि तेंही नाहीं ! दावा चालला नाहीं आणि जे आश्वासन देऊन मोठ्या प्रेमानें आमंत्रित होते ते चांदोरकरही शिरडीला निघून गेले !

‘ परि कर्माचें विधान । कांहींतरी असतें आन । सारखें ’

तुम्हीं दैवापुढें काय करणार ? तेथें हात टेकावे लागतात !

### पश्चात्तापाचा काय उपयोग ?

मोजणीदार गृहस्थास मोठा पश्चात्ताप झाला ! परंतु काय उपयोग होता त्याचा ? गोष्ट घडून गेली होती. मग त्यांनीं ठरविलें कीं, तें कांहीं नाहीं. नाना चांदोरकर यांचा सल्ला ऐकला असता तर सोन्याहून पिवळें झालें असतें. हातचा डाव हुकला. आतां दुरुस्ती करायची म्हणजे विलंब न लावतां शिरडीचें तिकीट काढायचें !

तिकीट काढलें आणि मोजणीदार गाडींत जाऊन बसले. शिरडींत जाऊन अगोदर नानांची भेट घ्यायची व त्यांच्या मध्यस्थीनें बाबांची भेट घ्यायची असा होता त्यांचा कार्यक्रम.

तुम्हीं कार्यक्रम ठरविणारे ! असें करायचें आणि तसें करायचें. परंतु ते करायचें व घडून यायचें वा घडून न यायचें कोणामुळें ? कर्ता–करविता कोण ? तो प्रभुराय ! याची खूणगांठ आपण सदासर्वकाळ मनाशीं बांधून ठेविली पाहिजे. ती आपण बांधीत नाहीं. कां ? तेथें येतो आडवा अंतरीचा अहंकार ! तो तर गळाला पाहिजे. आणि मोजणीदाराच्या बाबतींत तो क्षण आतां कांहीं झालें तरी मजल दरमजल करीत जवळ येऊं लागला होता !

मोजणीदारांचें शिरडी क्षेत्रांत आगमन झालें. आल्याबरोबर नाना चांदोरकरांची चौकशी केली; परंतु ते होते कुठें ? ते दर्शन घेऊन कल्याणला निघून गेले होते !

### एक मित्र भेटला

ते गेले म्हणून काय झालें ? ते गेले तर गेले ! तेथें अकस्मात त्यांना त्यांचे एक स्नेही भेटले ! त्यांच्याजवळ मोजणीदारांनीं आपली सारी

रडकथा सांगितली. ते काय म्हणाले ? " अहो ! बाबांच्या दर्शनाला मध्यस्थाची गरज मुळींच लागत नाहीं. त्यांचा दरबार सर्वांना सदासर्वकाळ खुला आहे. आता तुम्हीं बोलावीत आहांत तेव्हां मी येतों बापडा ! "

बाबा, त्यावेळीं नेहमींप्रमाणें चावडींत बसले होते. दोघांनींहि जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. बाबांना ओळख करून देण्याची मुळींच जरूरी नव्हती. बाबा अंतर्ज्ञानी ! दर्शन घेऊन मोजणीदार एका बाजूस जाऊन बसले. त्यांच्याकडे पाहून बाबा म्हणाले, " कसं काय ? ठीक आहे ना ? तुम्हांला वडगांवांत एक कानडी अप्पा भेटले. त्यांनीं तुम्हांला सांगितलें तें सत्य आहे; परंतु हा मार्ग कठीण आहे. रेड्यावर बसून नाणें घाट चढणें एकवार सुलभ म्हणता येईल, परंतु हा अध्यात्माचा घाट चढून पलीकडे जाणे वाटतं तेवढें सुलभ नाहीं बरें ! फार कष्ट घ्यावे लागतात ! "

## खूणगांठ पटली !

मोजणीदाराला बरोबर खूणगांठ पटली. त्यांनी पुनरपि बाबाना साष्टांग प्रणिपात घातला व म्हणाले, " बाबा ! तुम्हीच माझं रक्षण करणारे, मी शरण आलों आहे आपणाला. कृपा करा मज दीनावरं ! "

खरें पहातां कुठें वडगांव नि कुठें शिरडी ! वडगांवला ते कानडी अाप्पा भेटले. त्यांच्या हातांतील ' विचार सागर ' ग्रंथही पाहिला आणि त्यांनीच सांगितलें कीं, पुढें लौकरच एका महापुरुषाची भेट होईल. त्याप्रमाणें भेट झाली. हें केवढें भाग्य ! "

## बाबांचें मार्गदर्शन

असे विचार मनांत घोळताहेत. तोंच बाबा म्हणाले, " खरं आहे कानडी आप्पानीं सांगितलं तें ! त्या ग्रंथाची किंवा इतर कोणत्याही ग्रंथाची महती कितीही असली तरी त्याप्रमाणे आपल्याकडून आचरण घडले पाहिजे. पुस्तकांत लिहिलेलं पुस्तकांत राहिलं. विचार–सागर ग्रंथाचें महात्म्य तुम्हांला वडगांवच्या आप्पानीं सांगितलं ते अगदीं यथार्थ आहे; त्याचा आचार कसा करावा ? हें शिरडींत कळेल असं त्यानीं सांगितलं तें अगदीं बरोबर आहे. त्याचं असं आहे. आपण ग्रंथ वाचावा किंवा ऐकावा. परंतु ऐकल्यानंतर त्याचे मनन केलें पाहिजे. त्याची पारायणावर पारायणें झालीं पाहिजेत. मनावर त्याचा ठसा उमटला पाहिजे. त्याचा निदिध्यास घेतला पाहिजे. ध्यानीं मनीं ते विचार घोळून त्याप्रमाणें आचरण घडत गेलें पाहिजे. असं घडलं तरच त्या वाचनाचं सार्थक ! आपण ग्रंथ वाचला एवढ्यावरच आपली जबाबदारी नाहीं संपली. जें वाचलें तें कृतींत

उतरलं पाहिजे. नाहींतर उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणं प्रकार घडायचा. तसं घडतां कामा नये. वाचल्याप्रमाणें जर कां आपल्याकडून आचरण घडलं नाहीं तर तें वाचून व्यर्थ होय. तसेंच ग्रंथांतील महत्त्वाचा भाग आपण सद्‌गुरूकडून समजून घेतला पाहिजे.

बाबांच्या ह्या उपदेशानें त्या मोजणीदाराचे कान खाडकन् उघडले. मनाची बंद झालेलीं कपाटेंहि एकदम उघडलीं. संशय निरसन झालें व जें जीवनामृत हवें होतें तें बाबांच्या कृपेनें मिळालें.

तुम्हां–आम्हांलाहि त्या श्रद्धेचा लाभ होऊन जें बाबांनी सांगितलें तें आचरणांत आणण्याची सुबुद्धी होवो, हीच त्यांच्या चरणीं अनन्यभावें प्रार्थना.

—संपादक

---

# पुण्यतिथी उत्सव–मुंबई ऑफिस

दि. २२–१०–६६ रोजीं रेडिओस्टार श्री. सूर्यकांत मोहिले व श्री. मुळगांवकर यांचें सुश्राव्य भजन संध्याकाळीं ४ ते ६ व आरती होऊन उत्सव साजरा झाला. उत्सवास सर्व संस्थान नोकर हजर होते.

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# कर्मांतील आनंद

योगेश्वर श्री अरविंद

## कर्माचें स्वरूप

**कर्म म्हटलें कीं त्या ठिकाणीं कर्माचें साधन, कर्माचा कर्ता कामगार आणि कर्माचा करविता मालक अशा तिघांचा संबंध येतो. कर्माचें आणि कर्मांतील आनंदाचें रहस्य यांत आहे कीं, प्रत्येकानें आपल्या ठिकाणीं कर्मसाधन कोण, कामगार कोण व मालक कोण हें बरोबर निश्चित करून, त्या प्रत्येकाशीं असलेलें आपलेपणाचें आपलें नातें बरोबर निभवीत असावें.**

पहिली गोष्ट तुला शिकवायची ती ही कीं, तूं ईश्वराला आपला मालक म्हणून स्वखुषीनें मान्य करावेंस आणि तूं स्वतःला कर्मसाधन मानावेंस. हा "स्वतः" म्हणजे ज्याला तूं "मी" म्हणतोस ती बाह्य वस्तू. ह्या बाह्य वस्तूंत विशिष्ट ढाळाचें तुझें मन, विशिष्ट प्रेरक शक्तींचा तुझा प्राण, विशिष्ट आकाराचें, नाना गुंतागुंतीच्या रचनांनीं युक्त असें तुझें देहयन्त्र या सर्व गोष्टी येतात. या बाह्य वस्तूला तुझ्यांतील कामगार किंवा मालक समजण्याची चूक तूं करूं नकोस. ही वस्तु केव्हांहि कामगार किंवा मालक होऊं शकत नाहीं. तूं ईश्वराचें कर्मसाधन आहेस आणि हें स्थान नम्रपणें पण अभिमानानें, भक्तिमय सेवाभावानें व आनंदानें तूं स्वीकारावेंस. मालकाचे, ईश्वराचें निर्दोष पूर्ण कार्यक्षम साधन होण्यापेक्षां अधिक गौरवास्पद व अभिमानास्पद गोष्ट व्यक्तीला ( मन–प्राण–देहरूप 'मी'ला ) असूं शकत नाहीं.

तेव्हां 'तूं' प्रथम तुला सांगितलेलें काम बिनतक्रार करायला शिकावेंस. कोठें प्रहार करावयाचा हें तलवार ठरवीत नाहीं; बाण तो फेंकण्याची दिशा किंवा लक्ष ठरवीत नाहीं; यंत्राचे विभाग आपल्या विविध क्रियांनीं अमुकच पदार्थ निर्माण व्हावा असें ठरविण्याचा आग्रह धरीत नाहींत. तसेंच तूंहि कर. तें काम तुझ्यांतील प्रकृतीचें आहे, प्रकृति हा तुझ्या मालकाचा, ईश्वराचा, तुझ्या ठिकाणचा कामगार आहे. तो कामगार काय ठरवावयाचें तें ठरवील. त्यानें ठरविलेलें काम तूं त्याचें सचेतन, चैतन्ययुक्त साधन या नात्यानें करावयाचें आहेस; तूं या कामगाराच्या, तुझ्या प्रकृतीच्य

विशुद्ध धर्माला ओळखून जितका व जितक्या लवकर त्या धर्मानुसार वागण्यास शिकशील, तितके व तितक्या लवकर तुझ्याकरवीं घडणारें काम निर्दोष आणि सर्वांगपूर्ण असें होईल. उलट 'तूं' म्हणजे, तुझ्या मन–प्राण–शरीरानें, कर्मसाधनरूप 'तूं' नें विशुद्ध प्रकृतिरूप कामगाराचें न ऐकतां, बंड करून आपलाच हेका चालविण्याचें ठरविलें तर तुझ्याकरवीं घडणारें काम बिघडून मात्र जाईल.

ईश्वराचा निःश्वास तुझा प्रेरक प्राण व्हावा, त्या ईश्वरी प्राणशक्तीच्या जोरावर तुझ्या कर्मांचा रथ चालावा. तूं वादळाच्या गतीबरोबर उडणाऱ्या वाळल्या पानाप्रमाणें व्हावेंस; ईश्वराच्या हातांत तूं स्वतःला सर्वस्वी द्यावेंस, आणि त्याच्या प्रेरणेनुसार प्रहार करणाऱ्या तलवारीप्रमाणें व लक्ष्यावर उडी घेणाऱ्या बाणाप्रमाणें तूं वागावेंस. तुझें मन यंत्रांतील स्थितिस्थापक पोलादी पट्टीप्रमाणें, तुझी प्राणशक्ति, वाफेनें गतिमान् होणाऱ्या दट्ट्याप्रमाणें, तुझें काम, वस्तूला विशिष्ट आकार देणाऱ्या यांत्रिक पोलादी रंध्याप्रमाणें असावें. ऐरणीवर पडणारा घण, कारखाना चालविणारें वेगवान् गतियंत्र, व उंच आवाजानें दंवडी देणारें शिंग, तालबद्ध नादलहरींनीं आसमंत भरून टाकतात, त्याप्रमाणें तुझी वाणी तालबद्ध, उंच घुमणारी व घणाघाती होऊन तिनें ईश्वरी सामर्थ्याच्या घोषणेनें आसमंत भरून टाकावा. तुझ्या प्रकृतिधर्मानुसार जें नियतकर्म असेल, तें तूं ईश्वराच्या हातांतील यंत्राप्रमाणें करावेंस ही मुख्य गोष्ट आहे.

लढाईच्या खेळांत तळपणारी तलवार, सूं सूं करीत आपल्या लक्ष्यावर उडी घेणारा बाण, आकाशाच्या अवकाशांत भोंवळ आणण्यासारख्या फेऱ्या घालीत राहिलेली पृथ्वी, अनंत काळ भ्रमण करीत असलेला, दाहक प्रकाशक प्रचंड तेज विश्वभर फेंकीत फिरणारा सूर्य यांना आपापल्या स्वाभाविक क्रिया करण्यांत महान् आनंद असतो. त्यांच्याप्रमाणें ईश्वराच्या हातांतील जाणीवयुक्त यंत्र या नात्यानें तूं आपल्या स्वभावनियत कर्मांतील आनंद लुटावास हेंच योग्य आहे.

तलवार मला निर्माण करा असें सांगत नाहीं, वापरणारा तिला कसाहि वापरो त्याला ती आडवी येत नाहीं, वापरून मोडून गेली तरी त्याचें तिला दुःख नाहीं. तलवारीला तिची घडण चालली असतां, तिचा वापर चालला असतां, तिला बाजूला ठेवून दिलें असतां, तिला मोडून टाकली असतां—सर्व स्थितिगतींत सर्वत्र सारखा आनंदच आनंद असतो. असा सर्वत्र, सारखा आनंद मिळविण्याची किल्ली तूं शोधून काढ.

जें केवळ कर्मसाधन आहे, काम करण्याचें अवजार आहे, यंत्र आहे त्याला तूं कामगार समजलास, मालक समजलास; तूं काय असावेंस, काय व्हावेंस, तुला कशांत लाभ आहे, तुझा कोणता उपयोग आहे किंवा होऊं शकेल हें ठरविण्याचें काम तूं त्या

यंत्राच्या अज्ञानमय वासनेकडे सोंपविलेंस, म्हणून तुला दुःख भोगावें लागत आहे. तुला संतापाचे झटके येत आहेत. मानवानें संसारांत शिकावयाचा धडा तूं अद्यापि शिकला नाहींस म्हणून असें होत आहे. तूं हा धडा शिकावास म्हणून, तोंपर्यंत तुला अनेकदां लाल लाल ज्वाळांच्या नरक–भट्टींत, अत्यंत दुःख–संतापाच्या परिस्थितींत फेंकलें जाईल, अनेकदां तुला जन्म घ्यावा लागेल, आणि तुझ्या मनाला, प्राणाला व फलतः शरीरसंस्थेला नीट आकार येईपर्यंत पुनः पुनः अनेकदां ठोकलें व तापविलें जाईल.

तुझे मन–प्राण–देह कमी अधिक संस्कारहीन अपूर्ण स्थितींत आहेत म्हणून हा सर्व खटाटोप करावा लागणार आहे. प्रकृति ही तुझ्यांतील कामगार आहे. हा सर्व खटाटोप ती करीत आहे. कशासाठीं? तर तिचें काम, तिला घडावयास दिलेल्या अगदीं संस्कारहीन मन प्राण व द्रव्यरूप मसाल्यांतुन पूर्णप्रज्ञ चेतना आकारास आणण्याचें आहे म्हणून!

## कर्ता कोण? विश्वव्यापी प्रकृति

याप्रमाणें तुझ्यांतील कर्मसाधनरूप तूं कोण हें समजावून घेतल्यावर तुझ्यांतील कारागीर, कामगार कोण हें तूं पहावेंस. तुझी प्रकृति तुझ्यांतील कामगार आहे, पण तुझ्यांत व सर्व निसर्गांत एकच एक प्रकृति काम करीत असल्यानें, प्रकृतिरूप तूं, कर्मसाधनरूप 'तू' प्रमाणें मर्यादित नाहींस, विश्वव्यापक आहेस हें समजून घे.

कामगार प्रकृति, कोणाहि व्यक्तीची खासगी सत्ता नाहीं. तिला कसलीहि मर्यादा नाहीं. म्हणून असें म्हणतां येतें कीं, सर्व कांहीं निर्माण केलें आहे. प्रकृतिरूप 'तूं'नें; सूर्य आणि सूर्यमाला, पृथ्वी आणि तिजवरील प्राणिजात, तूं आणि तुझें, तूं काय आहेस तें आणि तूं काय जाणूं शकतो तें, हें सर्व तुझ्या प्रकृतीनें निर्माण केलें आहे.

ही प्रकृति आहे तुझी मित्र आणि शत्रु, तुझी रक्षक जननी अन् भक्षक डाकिनी, तुझ्यावर प्रेम करणारी आणि तुझें हालहाल करणारी, तुझी काळजी करणारी जवळची भगिनी आणि तुला ओळख न देणारी दूरची कोणीतरी परदेशिनी. तुझा आनंद आणि तुझा विषाद, तुझें पुण्य आणि तुझें पाप, तुझें बळ आणि दुर्बलता, तुझें ज्ञान आणि तुझें अज्ञान—हें सर्व कांहीं तुझी प्रकृतीच, असें म्हणतां येतें. तथापि असेंहि म्हणतां येतें कीं, तुझी प्रकृति, हें कांहींच नसून या सर्वांहून ती वेगळी वस्तु आहे; आणि या वस्तू तिच्या पूर्णप्रज्ञ–निर्मितीच्या प्रयत्नांतील प्रयासानें घडल्या गेलेल्या, तिच्या अपूर्ण प्रतिमा आहेत. कारण विश्वांतील विश्वमूलक मूळ आत्मज्ञान, आत्मस्थ अनंत शक्ति आणि अगण्य गुणगण हे तुझ्या प्रकृतीचें मूळ स्वरूप आहे.

**व्यक्तिविशिष्ट प्रकृति**

तुझ्यामध्यें या महान् प्रकृतीखेरीज तिच्यापासून निघणारी तिची अंगभूत तुझ्यापुरती लहान विशिष्ट वैयक्तिक 'प्रकृति,' प्रवृत्ति, क्रियाशक्ति आहे. या तुझ्या वैयक्तिक 'प्रकृतीच्या' प्रवाहाचा मार्ग तूं प्रामाणिकपणें चालावास म्हणजे नदीचा आरंभीं लहान असलेला प्रवाह रुंदावत रुंदावत शेवटीं महासागरास, तिच्या मूळ स्थानास ( महासागरांतील जलाचे मेघ, मेघाच्या जलाची नदी ) तिला भेटवितो, त्याप्रमाणें तुझा वैयक्तिक प्रकृतिप्रवाह रुंदावत जाऊन त्याच्या अनंत अनादि उगमस्थानाला तुला भेटवील.

तेव्हां, आतां तूं हें शिकावयाचें कीं, तुझा देह, विश्वभर अखंड पसरलेल्या मूल जड द्रव्यांत ज्या अनंत गांठी गांठी आहेत त्यांतील एक गांठ आहे; तुझें मन अखंड विश्वमनांतील एक भोंवरा आहे; तुझें जीवन अक्षय अखंड जीवनसागरांतील एक तरंग आहे; तुझ्यांतील शक्ति ही खास तुझी नसून, अखंडपणें तुझ्यांत व सर्व जीवांत कार्य करणारी एकच शक्ति आहे; तुझें म्हणून वाटणारें ज्ञान, सर्वत्र भरलेल्या अखंड ज्ञानाचा एक अविभक्त अविभाज्य किरण आहे; तुझें म्हणून वाटणारें कर्म, तुझ्यासाठीं केलें जात आहे—तूं व्यक्ति कर्मकर्ता नाहींस; कर्ता अखंड विश्वव्यापक प्रकृति आहे—या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन मी म्हणजे कोणी स्वयंपूर्ण, कोणाशींहि मौलिक अपरिहार्य संबंध नसलेली व्यक्ति आहे आणि मी असुक तमुक करीत आहे, हा चुकीचा समज तूं सोडून दे.

हें सर्व तूं नीट शिकलास, तुझें विश्वव्यापक अस्तित्व तूं ओळखलेंस, म्हणजे तुझ्या व्यक्तिगत वास्तव गोष्टींत, तुला मनमोकळेपणें अमर्याद आनंद लुटतां येईल. तुझें बळ, तुझा गौरव, तुझें सौंदर्य, तुझें ज्ञान आणि उलटपक्षीं तुझी दुर्बळता, तुझा अपमान, तुझी कुरूपता, तुझें अज्ञान या सर्व वैयक्तिक गोष्टींत तुला आनंदच आनंद होईल कारण; या सर्व गोष्टी परमपुरुषाच्या विश्व—नाटकांत त्या पुरुषानें स्वतःच्या मुखावर चढविलेले मुखवटे आहेत. स्वतःच घडलेल्या स्वतःच्या प्रतिमा आहेत याची तुला जाणीव असेल.

तूं स्वतःला मर्यादा कां घालून घ्याव्यास ? तुझ्यावर प्रहार करणारी तलवार व तुला आलिंगन देणारे बाहू, सूर्याचा लखलखाट व पृथ्वीचा फेर, गरुडाचें उड्डाण व मैनेचें गान, जें जें होतें, आहे आणि होणारे—त्या सर्वांत तूं आहेस; ही गोष्ट विवेकानें तूं जाणावीस व भावनेनें तिचा प्रत्यय घ्यावास; कारण तूं वस्तुतः अनंत आहेस आणि म्हणून तुला सर्वत्र आणि सर्वदा आनंदच आनंद भोगतां येण्यासारखा आहे.

प्रकृति आपल्या सर्व कर्मांत, कर्म करण्याचा आनंद भोगते आणि तिचा प्रियकर जो परमपुरुष, ज्याच्याकरितां ती कार्यरत आहे त्याचा आनंदहि भोगते. कारण त्या पुरुषाची जाणीव आणि क्रियाशक्ति, त्याचें कार्यकारी ज्ञान आणि त्याचें बाजूला ठेवलेलें ज्ञान, त्याची एकता आणि त्यानें स्वतःला स्वतः विभागून घडविलेली त्याची अनेकता, त्याची अनंतता आणि त्याच्या समर्याद मूर्ती हें सर्व मीच आहे हें सर्व प्रकृति जाणते. तूंहि हें जाणावेंस आणि तुझ्या प्रियकराचा आनंद तूं भोगावास. ( कारण तूं मर्यादित व्यक्ति आहेस त्याप्रमाणेंच अनंत प्रकृतीहि तूं आहेस. )

कांहीं लोक असे आहेत कीं, त्यांना आपण कारखाना, अवजार, घडलेली वस्तु, घडली जाणारी वस्तु असें कांहीं आहोंत हें कळतें, पण घडणाराला, अवजार वापरणाराला, कारखान्यांत काम करणाराला प्रकृति म्हणून न ओळखतां ते त्याला पुरुष समजतात; ही त्यांची चूक आहे. प्रकृतीच्या उच्च निर्दोष पूर्णत्वाच्या कारागिरीपर्यंत, वरीक चूक करणारे, क्वचितच पोहोंचूं शकतात.

अवजार सर्व तऱ्हेनें मर्यादित असतें. व्यक्तिरूप मन–प्राण–देहरूप प्रतिमा हें अवजार होय. कामगार मर्यादित नाहीं, विश्वव्यापक आहे. पण विश्वव्यापकत्वाबरोबर स्वनिर्मित व्यक्तींत व्यक्तित्वाचें काम करण्याकडेहि त्याचा कल आहे. मालक या दोहोंहून निराळा आहे. मनप्राणदेहरूप व्यक्ति आणि सर्व व्यक्तींत काम करणारी प्रकृति, यांपैकीं कोणीहि मालक नाहीं. कारण कोणीहि खरा पुरुष नाहीं.

## कर्मांचा स्वामी

व्यक्ति आणि प्रकृतीहून वेगळा असलेला हा मालक, तूं आहेस. तुझ्यांतील अवजाराची व कामगाराची ओळख करून घेतल्यानंतर, या मालकाची ओळख करून घेणें हें तुझें शेवटचें काम आहे. हा मालक गुणातीत आहे. रूपातीत आहे. कोणतेंहि रूप, कोणताहि गुण त्याला चिकटवूं नकोस. त्याच्याशीं एकरूप हो. तुझें अस्तित्व त्याच्याशीं एकरूप कर. तुझ्या जाणिवेंत त्याचें अनुसंधान ठेव; तुझी शक्ति त्याच्या आज्ञेंत ठेव; त्याचा अंकित होऊन रहा. आनंदांत असतां त्याच्या बाहूंत प्रवेश कर, तुझ्या जीवनांत, प्राण–व्यापारांत, देहांत, मनांत, त्यांच्या व्यवहारांत त्याच्या आदेशाप्रमाणें वागून त्याला कृतार्थ कर.

याप्रमाणें वागत राहिलास म्हणजे केव्हांतरी तुझ्या अंतरांत असलेला अंतर्दृष्टीचा डोळा उघडेल आणि त्याच्यासमोर एकमेवाद्वितीय खराखुरा पुरुष उभा राहील. तूं आणि तुजहून इतर, सर्व इतर आणि त्या सर्वांहून अधिक, असा तुझ्या कर्मांचा करविता आणि भोक्ता, कर्त्यांचा आणि कर्मसाधनांचा मालक, विश्वाच्या तांडवनृत्यांत आनंदातिशयानें आरोळ्या ठोकणारा आणि पाय

आपटणारा आणि त्याबरोबर तुझ्या आत्म्याच्या निःशब्द अंतर्गृहांत तुजबरोबर एकटा एक एकांतांत मौन धरून तुझी सोबत करणारा, असा तो खरा पुरुष तुझ्या अंतर्दृष्टीला दिसेल.

**कर्मांचें साफल्य**

याप्रमाणें मालकाचा आनंद आपलासा केल्यानंतर तुला झगडून मिळवावयाचें असें कांहीं राहणार नाहीं. कारण, मालक तुझी खासगी मत्ता, तुझा खासगी वांटा म्हणून स्वतःला तुझ्या हातीं सोंपवील व स्वतःबरोबर सर्व वस्तू, सर्व जीवांची जवळ असलेली व मिळवून आणलेली नानाविध संपत्ति, सर्व जीवांच्या साऱ्या क्रिया आणि सर्व भोग तुला तुझी खासगी मत्ता, तुझा खासगी वांटा म्हणून देऊन टाकील. याशिवाय ज्याचे भाग किंवा वांटे करतां येत नाहीं असेंहि कांहीं तुला तो देईल.

त्याच्या प्रसादानें तुझ्या अस्तित्वांत, आत्म्यांत तूं आणि इतर सर्व सामावतील, आणि 'नव्हे तूं, नव्हे दुसरें कोणीहि,' असें कांहीं तूं होशील. येथेंच कर्मांची परिपूर्णता होते आणि कर्मद्वारा गांठावयाचें सर्वोच्च शिखर हेंच असतें.



MATUNGA CLEANING WORKS
ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN
MODI NIWAS, BOMBAY 19
Washers, Dyers and Dry Cleaners.
A Pleasure to You—A Satisfaction to Us
Chemical Cleaners, Super Fine Darners
Master Dyers
*FOR*
Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths




कु. मिरा शा. लांमगे—५३ कामाठीपुरा ३ री गल्ली, मुंबई नं. ८ ह्या आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात.

मला श्रीसाईबाबांचा जो अनुभव आला आहे तो मी आपणापुढें सादर करीत आहे. आमच्या घरांत सर्वांनाच देवाधर्माचे अत्यंत वेड. त्यामुळें मलासुद्धां लहानपणापासून देवाच्या भक्तीची आवड. पूजा, अर्चा, जप, तप करण्याचा भयंकर नादच आहे मला. ज्यांना ज्यांना दृष्टांत झाला व त्यांना त्यांना साईबाबाचा फोटो म्हणा किंवा उदी न मागता, ज्यांना कुणाला मिळाली असेल अशा व्यक्तींनाच साईबाबा शिर्डीला बोलावितात. असें कित्येक साईभक्तांनीं मला सांगितलें. तेव्हां मी पण माझ्या मनांत ठरविलें. जेव्हां मला फोटो किंवा उदी काणी आणून देईल, किंवा सांपडेल तेव्हांच मी पण असे समजेन कीं, मला पण बाबा शिरडीला बोलावित आहेत.

असा माझ्या मनाचा निग्रह होतांच अगदीं सातआठ दिवसानीं रामनवमीच्या दिवशीं सकाळीं मी स्नान करून, कुंकू लावण्याकरितां बसले असतां, खोलींतच खाली पडलेला लहानसा लॉकेटमध्यें बसविण्याजोगा असा छोटासा साईबाबाचा फोटो मला मिळाला. मी सर्वांना तो दाखविला, पण कुणीच म्हणे ना कीं, माझा आहे म्हणून. घरांत नेहमीं येणाऱ्या, जाणऱ्यांना विचारून मी थकले. कुणाचाच नव्हता तो. तो फोटो साईबाबानेच मला दिला असे समजून मी कपाटांत ठेविला. त्या दिवसापासून माझी ओढ मात्र श्रीसाई चरणी लागून, शिर्डीला केव्हां जाऊं असें झालें. त्यांच्या कृपेनें मी लवकरच एक दोन दिवसांतच शिर्डीला गेले. श्रीसाईबाबांचें दर्शन घेतांना इतका कांहीं आनंद झाला कीं, असा आनंद मला केव्हांच झाला नव्हता. पूजा अभिषेक फारच छान करण्यास मिळाली. घरीं येतेवेळीं बाबांचा फोटो त्यांच्या समाधीवर ठेवून आणिला त्याचीच पूजा मी अद्याप करीत आहें.

नंतर कांहीं दिवसांनी माझ्या स्वप्नांत मला जो साईबाबांचा लहानसा फोटो मिळाला होताना, तो फोटो लॉकेट करून गळ्यांत घाल असें माझ्या मोठ्या बहिणीनें

येऊन सांगितले. तिच्या रूपाने बाबानेच असे सांगितले नसेल कशावरून ? म्हणून त्या फोटोचा सुंदर लॉकेट करून मी माझ्या गळयांत घातला. कांहीं वर्षे गेल्यानंतर मला मासिक पाळीचा त्रास होऊं लागला. सहन करण्याची पुष्कळ शक्ती श्रीसाई-बाबानें दिली होती, परंतु माझ्या पुजेला मात्र अडथळा येऊं लागला. तरी पण, नित्याचा कार्यक्रम माझा चालूच होता. मानसिक पूजा मी करीत असे. अशा वेळीं पूजा करूं नये. आपली सांवली ( छाया ) सुद्धा भगवंतावर पडूं नये वगैरे मला कांहीं लोक म्हणाले, आप्तनातलग पण म्हणाले. तूं अशी पूजा करतेस तें देवाला सुद्धां आवडत नाहीं, म्हणून तुला देव असा त्रास देतो. त्यावर मी म्हणाले, हें माझ्या हातांत नाहीं. हे श्रीसाई समर्थांच्या हातांत आहे. त्यानेंच सर्व दिलें आहे. पूजा, जप, आरती, प्रार्थना केल्याशिवाय मला बरेंच वाटत नाहीं त्याला मी काय करूं ? डॉक्टरी उपचार केले कीं, मला चांगले बरें वाटत असे.

बरेच दिवस अधूनमधून मला त्रास ( मासिक पाळीचा ) होत होता. एक दिवस असा कांही उजाडला कीं, त्या दिवशीं मासिक पाळीचा अत्यंत त्रास होऊन मला झोपूनच राहाणें भाग पडलें. घरांतील सर्वजण घाबरले. त्याच दिवशीं रात्रीं माझ्या स्वप्नांत साईबाबा वाघाच्या रूपानें म्हणजे फक्त साईबाबांचा चेहरा ( तोंड ) व बाकी सर्व ( अंग ) शरीर वाघाचें असून दाट व भरगच्च अशा झाडाझुडपाच्या भयंकर भयानक अरण्यांत जिकडे तिकडे काळोख पसरलेला अशा वेळीं सैरावैरा धांवत पळत आलेला वाघ, माझ्यासमोरच येऊन उभा राहिला. मी म्हणाले, देवा असे दर्शन मला का देतां ?' असे मी बोलतच आहे इतक्यांत क्षणाचाहि विलंब न लागता वाघाची एक बाई झाली. तितक्यांतच मी पुढे चालू लागले. तेव्हां त्या बाईनें माझा हात धरला आणि म्हणाली, 'तुलाच बरें वाटत नाहीं ना ?' मी म्हणाले 'हो, मी काय करूं म्हणजे मला बरे वाटेल.' ती म्हणाली, 'मागेन तें तूं देशील का ?' मी म्हणाले, तूं जें मागशील तें मी देण्यास तयार आहे.' ती म्हणाली, 'मला हिरवे खण, सर्वच कांहीं मला हिरवे, हिरवे दे म्हणजे तुला लवकर बरे वाटेल. त्याप्रमाणे मी सर्व कांहीं हिरवे खण वगैरे घेऊन देवीला चढविले. कारण आपण हिरवे खण कुणाला चढवित असतो, देवीलाच. म्हणून मी महालक्ष्मीला चढविले. आणि मला थोडें बरेंहि वाटूं लागले.


तरी पण माझ्या आईला व बहिणीला मला जो कांहीं त्रास वेदना झाल्या होत्या त्या त्यांना असह्य होऊन त्यांनीं माझ्या मोठ्या बहिणीला पत्र पाठविलें. तिची एकुलती एक मुलगी व जांवई डॉक्टर M. B. B. S. असून F. R. C. S. व D. G. O. ह्या परीक्षा इंग्लंडला देऊन, पास होऊन आल्यामुळें त्याचा डॉक्टरचा जम नागपूरमध्यें फारच चांगला बसला आहे. त्यांना आमचें पत्र पोचून, चैन पडलें नाहीं. त्यांनीं विलंब न करतां पत्र पाठविले.

ते असे—आता तुला औषधानें बरे वाटते. पुढे तुला औषध पण लागू झाले नाहीं तर मग काय करणार. वगैरे बोधपर पत्र वाचून शिवाय तूं इकडे माझ्याकडे, नागपूरला ये, मी तुला बरी करीन; असें काळजीपूर्वक व प्रेमळ पत्र वाचून माझ्या मनांत, अनेक विचाराचे तरंग नाचूं लागले. काय करावे व काय नाहीं, असें झालें. मनाची शांती विश्रांती व सुख ह्या जगांत कुठेंच मिळण्याचें ठिकाण नाहीं तें फक्त परमेश्वराच्या पायांपाशीं असते; परंतु सबंध आयुष्य संपेपर्यंत ते आपल्याला उमजत नाहीं, समजत नाहीं, आणि जरी समजलें तरी तें तात्पुरतेंच. शेवटीं मी साईबाबांना सारखी विचारीत होतें, देवा, बाबा, मी काय करूं, जाऊं कीं येथेंच राहूं ? त्यांच्या फोटोकडे पाहिलें कीं, ते नागपूरलाच जा, तुझे सर्व कांहीं ठीक होईल. असे त्यांच्या फोटोकडे पाहिलें कीं वाटत असे. नंतर मी, माझी आई नागपूरला गेलों. एकुलती एक लेक असल्यामुळें दोघी मायलेकी एकत्रच राहातात. त्यांच्याच मजल्या-खालीं हॉस्पिटल आहे.

माझ्या भाचीनें मला तपासलें. नंतर नागपूर मधल्या एका मोठ्या लेडी डॉक्टरनें पण मला तपासलें. त्या म्हणाल्या, तुम्हांला ऑपरेशन केलें पाहिजे. आतां तरी नाहीं म्हणालांत तरी पुढें हें करावें लागणारच. कांहीं घाबरूं नका. मी येईन तुमच्या ऑपरेशनच्या वेळीं. कारण मेजर ऑपरेशन आहे. मी म्हणालें, जशी तुमच्या दोघींची इच्छा. मला काय कळतं डॉक्टर. माझ्या मनाला काय वाटलं असेल त्यावेळीं ह्याची कल्पना श्रीसाईबाबाच करूं जाणे. माझ्या मनाला कुठें स्थिर अशी जागा मिळेना. भीतीनें माझ्या हृदयांत थैमान घातलें होतें. गोंधळलेल्या जीवा आतां कसें होईल तुझें असें वाटत होते मला. परंतु जो कोणी मला भेटे तो असेच म्हणत असे कीं, कांहीं घाबरूं नका. तुम्हांला बरें वाटेल. कुणाच्याही मुखांतून वाईट असे उद्गार निघाले नाहींत. माझें मन रमविण्याकरितां मला माझी भाची व जांवई रोज फिरावयास नेत असे. त्याप्रमाणें माझी मोठी बहीण व आई रात्रीं कीर्तनाला नेत असे. परंतु मी माझे मन साईच्या नामस्मरणांत गुंतवित होते. माझी मासिक पाळी आल्यानंतर पांचसहा दिवसानें माझे ऑपरेशन होणार होते. त्यामुळें मी एकसारखा, देवाचा ध्यास घेतला होता. उठता, बसता, ग्रास घेतां, वेळोवेळी, क्षणोक्षणी, पदोपदीं, मी माझ्या साई देवाला विचारीत होते. देवा खरेंच का मी ऑपरेशन करूं. परतु माझा देव माझ्यावर रुसला कीं काय असें वाटत होते. अनेक कल्पनाचें तरंग उठत होते. परंतु माझा देव प्रत्यक्ष सांगत नव्हता, म्हणजेच बोलत नव्हता, पण तो माझ्याशीं अंतःरंगांत बोलत होता. खरंच तूं ऑपरेशन कर, बरीच होशील. तरीपण माझें समाधान व्हावें तसें झालें नाहीं. आतां उद्यां माझे ऑपरेशन होणार आहे. देवा अजूनहि तूं मला दृष्टांत देत नाहींस स्वप्नांत पण कांहीं सांगत नाहींस. आत्मविश्वास आहे खरं, पण मग तुझी मर्जी,

असे मी निराशेने, मनांतल्या मनांत बोलून मी खाली हॉस्पिटलमध्यें, आदल्या दिवशी सकाळी मला तपासण्याकरीतां बोलाविले होते. म्हणून मी टेबलावर जाऊन झोपले. डॉक्टरने ( माझ्या भाचीने ) तपासलें. नंतर मी उठले, त्यावेळीं मला पंचतत्त्वाचे दर्शन झाले. मला एकदम नवचैतन्यरुपी धैर्य आल्यासारखे झाले. आणि तेव्हां माझी पूर्ण खात्री झाली, माझा देव माझ्या हृदयरुपी मंदिरांत बसला आहे तर मग भीति कसली ? आता साईनाथानें मला कसलीहि भीति ठेविली नाहीं. असा मनाचा निग्रह करून मी धावत, धावत जाऊन मी माझ्या आईला व बहिणींला सांगितले. हें पहा मला पंच-तत्त्वाचे दर्शन झाले. तुम्ही मुळीच काळजी करूं नका. श्रीसाईबाबा माझे ऑपरेशन फारच छान करणार आहेत.

मी देवाला नेहमी हेच मागत होते. देवा ऑपरेशनच्यावेळीं टेबलापर्यंत जाताना मला धैर्य दे. तुझे नाम माझ्या मुखांत ठेव व तुझी मूर्ति माझ्या डोळ्यांत ठेव. इतके तरी त्यावेळी मला दे म्हणजे मी सर्व मिळविल्यासारखे होईल. खरंच देवानें माझी हाक ऐकली आणि अगदी जशी इच्छा तसेंच फळ मला दिलें. श्रीसाईंच्या नामस्मरणानें माझे ऑपरेशन ता. १८–९–६४ सप्टेंबर मध्यें चांगले झाले. साईबाबानी कांहींएक त्रास न होता निर्विघ्नपणें ऑपरेशनमधून माझी आनंदाने सुटका केली. इतकी माझ्यावर साईबाबानीं कृपा केली कीं, मला रक्त सुद्धां द्यावे लागले नाहीं. प्रेशर पण चांगलेच ठेविले. त्याचप्रमाणें ऑपरेशनच्या एक महिना आधी माझ्या भाचीनें माझी जी कांहीं काळजी घेतली ती फारच अवर्णनीय होती. त्याशिवाय ऑपरेषन झाल्या-नंतरहि तीन दिवस डोळ्यांत तेल घालून सतत माझ्या जवळ बसली होती. तिच्या कष्टाचें फळ साईबाबानें दिल्याबद्दल तिला पण अत्यंत आनंद झाला. साईबाबाच्या कृपेने तिने आतापर्यंत जितकीं ऑपरेशन केलीं तितकीं यशस्वीच झालीं. एकहि अयशस्वी झाले नाहीं. याचे कारण निस्सीम भक्ति हवी. म्हणुन अखंड नाम तुझे देवा । म्हणूनि घेतलासि धावा । असे म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. सर्व संकटांचा परिहार करणारा परमेश्वर आहे, हें लक्षांत ठेवून हरी भजनीं आपण लागावें. आपलें कल्याण त्यांतच आहे.



# श्री साईबाबांचें उत्थान

( ले :—द. शं. टिपणीस )

श्री साई चरित्र अ. ४४ मध्यें श्री साईबाबासंबंधीं एक विलक्षण घटना देण्यांत आली आहे. त्या घटनेकडे साईभक्तांचें फारसे लक्ष जात असावें असें वाटत नाहीं. साईबाबांनीं केलेला एक चमत्कार याखेरीज त्यांत कांहीं विशेष आहे असें सहसा वाटत नाहीं. सत्चरित्रांत आलेली घटना पुढीलप्रमाणें आहे. एके दिवशीं बाबा म्हाळसापतीना म्हणाले 'आम्ही तीन दिवस ब्रह्मांडी प्राण चढवितो. आमची नीट काळजी घ्या. सांगतो त्या जागीं निशाणे लावा व मग तेथें आमची समाधि खोदा.' असें म्हणून बाबांनीं प्राण ब्रह्मांडीं चढविला. सर्व शरीर निश्चळ झालें. मृतप्राय झालें. भगतानें बाबांचे मस्तक मांडीवर घेऊन त्यांच्या देहाचें रक्षण केलें. याप्रमाणें दोन दिवस गेले. तिसरा दिवस उजाडला. शरिरांत प्राण येण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. शरीर काल्याप्रमाणें थंडगार. भगताखेरीज बाकीच्या लोकांची खात्री झाली कीं, बाबा गेले. त्यांनीं जगाचा निरोप घेतला. श्री नृसिंहस्वरस्वतीनीं आपण दूर प्रवासास जातो असें शिष्यांना सांगून आपलें अवतार कार्य संपविले त्याचप्रमाणें ब्रह्मांडीं वगैरे सांगून बाबांनीं आपला कायमचा निरोप घेतला. तीन दिवस होत आले अजून कांहींच चिन्ह दिसत नाहीं. निघून गेलेला प्राण पुन्हां कां परत येणार? वास्तव बाबांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांच्या देहाचें विसर्जन करावें, असें बहुतेकांचें मत पडलें. पण भगताची निष्ठा और. बाबांचे शब्द प्रमाण. त्याला लोकांचे विचार पटेनात व तो मांडी काढीना. होय नाहीं करण्यांत बाबानीं सांगितलेला काल संपत आला. तिसऱ्या दिवशीं रात्रीं दहाचा सुमार असेल. शरिरांत हळूं हळूं उष्णता येऊं लागली व भगताला आशा आली. हातपाय हलूं लागले व थोड्याच वेळांत नेत्र उघडून बाबानीं हंसत हंसत भगताकडे पाहिलें. बाबा उठून बसले. भगताची निष्ठा फळाला आली. हा बाबांचा पुनर्जन्म, ही त्यांची दुसरी जयंती. अशा प्रकारें बाबांच्या उत्थानाची हकिकत चरित्रांत दिली आहे. अशा प्रकारचें उत्थान येशु खिस्ताच्या जीवनांतही आहे. क्रुसावर दिल्यानंतर तो पुन्हां सजीव झाला. अशा प्रकारच्या घटना क्वचितच होतात, पण त्या होतात हें खरें. असें कां व्हावें? या उत्थानाचा अर्थ काय? या संबंधी थोडाफार विचार करण्याचा प्रयत्न करूं.

पोथी म्हटली कीं तिला ऐतिहासिकतेपेक्षां अध्यात्मिक महत्त्व अधिक असते.

अध्यात्मिकदृष्ट्या भक्तांना मार्गदर्शन हा अशा ठिकाणीं मुख्य उद्देश असतो. त्यामुळें अशा चरित्रलेखनांत कालानुक्रम पुष्कळ वेळां पाळला जात नाहीं. एकादी घटना केव्हां घडली, साक्षी कोण या ऐतिहासिक काथ्याकुटीपेक्षां त्या घटनेमागे कोणते तत्त्व, धडा, बोध वा मार्गदर्शन आहे हें अधिक महत्वाचें असतें. संतचरित्र भावनेच्य वेष्ठणांत सादर केलेलें असते. कोणत्याही संतचरित्रांत बुद्धिपेक्षां भावनेचा, ज्ञानापेक्षां भक्तीचा पसारा अधिक असतो. असें असलें तरी कित्येक अध्यात्मिक घटना अशा असतात कीं, त्यांचा नक्की काल माहीत झाल्यास त्यामुळें चरित्रनायकाच्या जीवनांत कशी क्रांति वा बदल होत गेला, हें समजण्यास सोपे जाते; सुदैवानें ज्या घटनेचा आपण विचार करीत आहोंत त्या घटनेचा काल अजमावण्याइतपत पुरावा श्रीसाई-सत्चरित्रांत आहे. यामुळें शिर्डीत प्रथम आलेले बाबा व ज्यांना बहुसंख्य भक्तांनीं पाहिले आहे व आजही आपण प्रतिमा वा मूर्तिरूपानें पहातो तो बाबा या दोन बाबांतील फरक आपण अजमावूं शकतो; तरीसुद्धां बहुतेक घटनांचा कालानुक्रम अज्ञात असल्यामुळें बाबांच्या पूर्वायुष्यांतील (उत्थानापूर्वी) व उत्तरायुष्यांतील (उत्थानानंतर) घटनांचे वर्गीकरण करताना अंदाज करणें अपरिहार्य झाले आहे. बाबांच्या जीवनांत बदल झालेले दिसतात. बाबांचें जीवन, तें व्यतीत करण्याची त्यांची पद्धत, भक्तांशीं बोलण्याची त्यांची रीत, सर्वच लोकविलक्षण वाटतात. आपल्या जीवनांतील कांहीं गोष्टींचा बाबांनी कधीच थांगपत्ता लागू दिला नाहीं. शिर्डीतील लोकांना बाबा प्रथम दिसले तेचमुळीं पूर्वायुष्याच्या अज्ञात पटावर एक तेजःपुंज बालमूर्ति म्हणून. नंतर ते गुप्त झाले. कांहीं वर्षांनीं पुन्हां शिर्डीत आले. ते केव्हां आले, कसे आले व कोणाबरोबर याची हकीकत चरित्रांत दोनदां, पण निरनिराळी आलेली आहे. यामुळें खऱ्याखोट्याचा निवाडा करणें अशक्य आहे. अशाच तऱ्हेची दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचा धर्म व जात याचाही पत्ता अद्यापपावेतो कोणास लागला नाहीं. भक्तांच्या कल्याणासाठीं वा त्यांना मदत करण्यासाठीं बाबांनी अनेक रुपे वेळोवेळीं धारण केली आहेत. असें एकच रुप आहे कीं, त्यावेळी धारण केलेल्या रुपाला उद्देशून मी कोण हे बाबा बोलले आहेत; त्यावरून कांहीं समजण्यासारखे असले तर समजावें. हे सांगण्याचा उद्देश एवढाच कीं, बाबांच्या आयुष्यांत ही जशीं वैशिष्ट्यें आहेत त्याचप्रमाणें त्यांच्या जीवनांत वेळोवेळीं जे बदल झाले तेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. बाग करण्याचा बाबाना शौक होता. कांहीं वर्षें त्यांनी पेहलवानी जीवन कंठिलें. कांहीं वर्षें त्यांनीं वैद्यकीय व हकीमकी केली. दवा देऊन लोकांना बरें करण्याचें कार्य त्यांनीं केलें. पुढें हें सर्व सोडून दिलें. बाबांच्या जीवनांतील पूर्व-आयुष्यांतील कार्यपद्धतींत उत्तर आयुष्यांत आमुलाग्र बदल झालेला दिसतो. कोणाशीं न बोलणारे बाबा पुढें बोलके होऊन अनेकांना अनेक प्रकारें मार्गदर्शन करूं लागले.

पूर्वी स्वच्छेनें वाटेल तिकडे फिरणारे बाबा मशिदीमध्यें स्थिर झाले. कोणाला जवळ न येऊं देणारे बाबा भक्तांच्या घोळक्यांत वागूं लागले. औषधें देऊन रोग बरे करणाऱ्या बाबांनीं पुढें उदीला अमृतत्व देऊन भक्तांच्या रोग व संकट निवारणार्थ चिरंजीव करून ठेवले. बाबांच्या नंतरहि हें अमृत आज भक्तांच्या अहोरात्र उपयोगी पडत आहे. औषधें देऊन बाबांना हें कायम स्वरुपाचे कार्य करतां आले नसते. या व इतर घटनांचा काल अज्ञात असला तरी असें वाटते कीं, अबोला सोडून भक्तांच्या घोळक्यांत मोकळ्या मनानें व हास्यविनोद करीत बाबा वावरूं लागले तो दिवस तोच असला पाहिजे कीं, ज्या दिवशीं बाबांच्या वाणींतून, नेत्रांतुन नव्हे सर्व रोमरोमांतून शिर्डी व हळूंहळूं सर्व भारत व्यापणारें विलक्षण सामर्थ्य व तेज उफाळून आलें. असा कोणतातरी एक दिवस असला पाहिजे कीं, ज्या दिवशीं बाबांच्या कोशातून अशक्य हा शब्द नाहींसा झाला व म्हणेल ते होईल व मानेल त्यावर सत्ता चालवीन असें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं आलें. असा कोणतातरी दिवस त्यांच्या जीवनांत असला पाहिजे. केवळ योगसिद्धि पावलेले सिद्ध पुरुष न राहता सर्व चराचर व्यापून राहणाऱ्या शक्तीत त्याचें रुपांतर झालें. असा दिवस व अशी घटना जीवनांत कुठें ना कुठें तरी असली पाहिजे. जें अव्यक्त तें बाबांच्या शरिराच्या आधारें शिर्डीत वावरूं लागले. तो दिवस बाबांच्या जीवनांतील क्रांतिकारी दिवस म्हटला पाहिजे. ज्याक्षणीं फकिराच्या वेषांत परब्रह्म शिरर्डीत वावरूं लागले तो क्षण शिर्डीकरांच्याच नव्हे तर अखिल भारताच्या भाग्याचा होय. ज्या दिवशीं बाबा परब्रह्मांत मिसळले व पुन्हां तें परब्रह्म त्यांच्या रूपानें वावरूं लागले तो त्यांचा पुर्नजन्म दिन होय. त्या दिवशीं परमेश्वरानें बाबांच्या रूपानें शिर्डीत अवतार धारण केला.

हा दिवस म्हणजे बाबांचा जयंती दिन. या दिवसाला महत्त्व आहे आणि म्हणून बाबानीं आपल्या लौकिक जन्मदिनाचा कोणालाही थांगपत्ता लागूं दिला नाहीं. बाबांची जयंती साजरी करावयाची असेल तर तशी सोय बाबांनीं अगोदर पोथींत करून ठेवली आहे. हा दिवस नक्की कोणता हें मात्र थोड्याफार हिशोबानें शोधून काढावें लागेल. साई चरित्रांत उल्लेख आहे तो असा. ‘मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा’ ( ब्रह्मांडी प्राण चढविला ). ‘त्रेचाळीस वर्षांमागें वियोग’ ( होता ). तीन दिवसांनीं रात्री १० च्या सुमारास पुन्हां चेतना आली. दुसरा हिशोब असा आहे. ‘पोथी पूर्ण शके एक्कावनी ( झाली ) व ‘बत्तीस वर्षांपूर्वीच समाधी’ होती ). पहिल्यावरून हिशोब केला तर मार्गशीर्ष वद्य ३ व वेळ रात्री १०, हा बाबांचा उत्थान दीन येतो. हाच हिशोब खरा आहे असा मात्र दावा नाहीं. अधिक संशोधानें कोणास कांहीं अधिक उमगल्यास त्यानें तें अवश्य जाहीर करावें. मुद्दा इतकाच कीं, हा जो कांहीं दिवस असेल तो अति महत्त्वाचा आहे व तो बाबांचा

जयंती दिन समजावा; कारण पूर्वी जे साई होते ते या दिवशीं बाबा म्हणजे पालन-पोषण कर्ते झाले; व साईबाबा शिर्डीत अवतीर्ण, झाले. वरील विवेचन वाचून कोणालाही शंका येईल कीं; या दिवसाला एवढें महत्त्व कां ? असें काय घडलें कीं हा दिवस मोलाचा व पवित्र समजावा ! हें महत्त्व समजण्यास परमेश्वरी अवतार म्हणजे काय, तो कसा, केव्हां व कशासाठीं होतो, हें ध्यानीं घेणें अवश्य आहे. म्हणून त्याचा आतां विचार करूं.

परमेश्वराचे अवतार दोन प्रकारचे असतात. एक अवरोहात्मक व दुसरा आरोहात्मक. एकांत परमेश्वर खालीं उतरून मानवाप्रत येतो तर दुसऱ्यांत मानव परमेश्वराप्रत जातो. अवरोहात्मक अवतार हा प्रत्यक्ष परमेश्वराचाच अवतार होय. या अवतारांत परमेश्वर मानवी रुपांत अगर अन्य प्राणी रुपांत प्रत्यक्ष जन्म घेतो, मानवी देहानें लोकांत वावरू लागतो व कार्य करूं लागतो. अशा अवतारांत परमेश्वराला आपल्या मूळ रूपाची जाणीव असते. परंतु कांहीं विशेष उद्दिष्ठ साध्य करण्यासाठीं मानवी रुपांत वावरून तो मानवी व्यवहार करीत असतो. आपल्या धर्म-समजुतीप्रमाणें असे परमेश्वरी अवतार दहा झाले आहेत व अकरावा कलंकी नामक अवतार भविष्यकाळीं होणार आहे. श्रीराम, श्रीकृष्ण हे या कोटींतील अवतार होत. या अवताराचा उद्देश दुष्टांचा नाश व धर्मस्थापना होय. स्थापना म्हणजे एखादा धर्म (religion) अगर पंथ नव्हे. तर त्या कालास अनुसरून व येणाऱ्या भविष्यकालास अनुरूप होईल अशा अवस्थेप्रत मानवी प्रगती साधून देणारा मार्ग, आचार धर्म जनतेला देणें होय. या ब्रह्मांडाची सतत जी उत्क्रांति होत आहे, त्या उत्क्रांतीमध्यें मानवानें योग्य स्थान मिळवावे एवढेच नव्हे तर उत्क्रांतीला हातभार लावून तो अधिकाधिक प्रगत करण्याचे प्रयत्न करावे या हेतूच्या सिद्धर्थं मार्गदर्शन करण्यासाठीं परमेश्वर अवतार घेत असतो. विश्व व वैयक्तीक प्रगति दोन्हीहि एकमेकास अनुरूप होऊन मानव हा आपली चाल विश्वाच्या चालीबरोबर ज्या योगे ठेवील असा मार्ग दर्शित करण्यासाठीं परमेश्वर अवतरत असतो. सहाजिकच अशी शंका येईल कीं, परमेश्वर सर्व समर्थ असतां, वर उल्लेखिलेले कार्य करण्यासाठीं त्याला मानवी रूप धारण करण्याची जरुरी काय ? बसल्या ठिकाणाहून तो या सर्व घडामोडी घडवून आणूं शकणार नाहीं काय ? शकेल. पूर्णपणें शकेल. ( या सामर्थ्याचें प्रात्यक्षिक बाबांनीं अनेक वेळां दिले आहे. ) परंतु यामुळें परमेश्वरी सामर्थ्याचें कौतुक, आदर केला जाणार नाहीं व त्यामुळें मानवाच्या ठिकाणीं मुळांत असलेले परमेश्वर प्रेम व भावना यांच्यांत खळबळाट न झाल्यानें मानवाची वैयक्तिक प्रगती व्हावी तशी होणार नाहीं. प्रत्यक्ष परमेश्वराला मानवी रुपांत पाहिल्यानें मानवी मनावर जो परिणाम होईल तो पडद्याआड राहून परमेश्वरानें केलेलें कार्य पाहून होणार नाहीं. रामानें रावणाला मारलें हें पाहून रामपराक्रमाबद्दल जें कौतुक व रामा-

बद्दल जें प्रेम वाटते तें कुठेंतरी रावण एकाएकी मरून पडला असता तर वाटलें नसतें व मागाहून परमेश्वरानें रावणास मारलें अशी बातमी आली असती तर 'ऊं. त्यांत काय मोठें ?' असें म्हणून आपण विशेष लक्ष दिलें नसतें. देवाच्या पराक्रमापेक्षां मानवाच्या पराक्रमाचें कौतुक व अभिमान मानवाला अधिक वाटतो व हें मानवी धर्मास अनुसरून आहे. मानवालाहि देवतुल्य पराक्रम करतां येतो वा कर्तृत्व गाजवतां येते याची खात्री परमेश्वरानें मानवी रुपानें वावरून, मानवी जीवन जगून, मानवी व्यवहार करून पराक्रम केल्याखेरीज कशी येणार? मूळ उद्देश साधला तरी हे उद्देशांग परमेश्वर मानवी रुपांत अवतरल्याखेरीज साध्य होणार नाहीं. म्हणूनही परमेश्वराला मानवी अवतार धारण करावा लागतो. अशा गोष्टींत आणखी एक उद्देश असतो, व तो म्हणजे जीवनाचा आदर्श, अर्थात त्या कालास अनुसरून व भविष्यकालास पोषक असा जनतेपुढें ठेवणें हा होय. रामाचा अवतार दुष्टांच्या नाशासाठीं व सज्ज-नांच्या रक्षणासाठीं असला तरी राज्यवैभव सोडून सर्वसाधारण जनतेप्रमाणें जीवन जगून रामानें आपल्या जीवनांत जे आदर्श निर्माण करून ठेवले आहेत, ते अमर आहेत. पतिपत्नी, भाऊ—भाऊ वगैरे नात्यांतील व्यवहार उच्च पातळीवरून कसें करतां येतात याचें सुंदर दर्शन रामचरित्रांत होते. खुद्द अवतार परमेश्वराचा राम असूनहि सर्वसाधारण मानवाप्रमाणें जीवन व्यतीत करून संकटाशीं झुंज देतो व त्यांतून जयश्री संपादन करतो तेव्हां परमेश्वरी नव्हे तर मानवी रामाबद्दल आपणास अधिक कौतुक वाटतें व आपल्याप्रमाणें रामालाहि हर्षविशादादी भावना आहेत हें पाहिल्यावर देवळांतल्या रामापेक्षां रामायणात वावरणारा राम आपणास अधिक जवळचा वाटूं लागतो. परमेश्वर झाला तरी त्याला नियतीच्या नियमांचे बंधन असते, मग मानवाला तें असलें तर त्याबद्दल खेद मानण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट भरताची समजूत घालतांना 'पराधीन हा जीव मानवाचा' असें त्याला राम सांगतो यांत दिसून येतें. आदर्श जीवन जनतेपुढें ठेवणें हा रामचरित्राचा उद्देश आहे तर राजकीय डावपेंच, अहिंसा, शांति, क्षमा व कर्तव्य यांतून निर्माण होणाऱ्या संघर्षांतून मार्ग कसा काढावा याचें विवेचन गीतेंत करून संकटकालीं मलीन होऊं पहाणाऱ्या मनाला सतेज करण्याचे कायमचे अमृत श्रीकृष्णानें जगाला देऊन ठेवले आहे. अशाप्रकारच्या निरनिराळ्या हेतूनें परमेश्वर मानवी रूपानें अवतरतो. या अवतारांत परमेश्वर आपली जागा सोडून मानवाच्या पायरीवर येतो म्हणून याला अवरोहात्मक अवतार म्हणतात.

दुसरा प्रकार म्हणजे आरोहात्मक. यामध्यें परमेश्वर आपली जागा न सोडता मानवालाच आपल्याप्रत ओढून घेतो. जीवाचा शिव होतो. एकेकाळीं सर्वसाधारण असलेला मानव कांहीं वर्षांनीं परमेश्वरी अवतार होऊं शकतो. त्याचें पूर्वीचें अंतरंग साफ बदलून त्या ठिकाणीं परमेश्वरी शक्तीनें पूर्ण व्यापलेलें अंतरंग येते. त्याच्या

मध्यस्थीनें परमेश्वर आपलें कार्य घडवून आणतो. या अवतारांत परमेश्वर मानव योनींत जन्म घेत नाहीं तर मानवांतीलच श्रेष्ठ व लायक मानव परमेश्वरी रूपांत मिसळल्यानें, अव्यक्तांत समरस झाल्यानें त्यांच्या ठिकाणीं परमेश्वरी सामर्थ्य प्रगट होते व मानवरूपांत परमेश्वरानें जें जें केलें असतें तें तें तो सर्व करूं शकतो. उच्चकोटींतील श्रेष्ठ साधुसंत हे अशाप्रकारचे अवतार होत. अशा मालीकेला जन्म देण्याचें भाग्य महाराष्ट्राला इतरांपेक्षां अधिक लाभले आहे. असे अवतार दोन कारणास्तव होत असतात. एक म्हणजे मानवाचा देव होऊं शकतो, देवत्व पावण्याची शक्ति मानवांत मुळापासूनच सुषुप्त अवस्थेंत असते. यामुळें तपश्चर्या व योग्य आचरण यांच्या साह्यानें ही शक्ति जागृत करून व तिची वाढ करून देवत्वाप्रत जाणें हें मानवाला साध्य आहे हें जनतेला पटवून देणें हें होय. परमेश्वराचा अवरोहात्मक जो अवतार त्याच्या कार्याला योग्य पार्श्वभूमि तयार करणें हें दुसरें कारण. मानवी जीवन-राहणी, त्याची मानसिक ठेवण, जगाकडे पहाण्याचा त्याचा दृष्टीकोन एवढेच नव्हे तर त्याची शारीरिक ठेवण यांत सारखा बदल होत असतो. हा बदल भाविष्यकाळीं होणाऱ्या अवरोहात्मक अवताराच्या कार्याला पोषक होईल असा घडवून आणणें हें आरोहात्मक अवताराचें कार्य आहे. परिस्थितीस अनुसरून पण भविष्यकालीं पाहिजे त्या तऱ्हेचा मानव निर्माण करील अशा प्रकारचा आचारधर्म, नितिनियम, बंधने यांची आखणी करून लोकांना वेळोवेळीं मार्गदर्शन करणें हें आरोहात्मक अवताराचें कार्य आहे. हें कार्य हजारो वर्षें चालू असतें कारण मानवीरुपांत परमेश्वरानें जन्म घेणें हें युगे युगे संभवामि आहे. सुमारे २००-३०० वर्षांच्या कालांत मानवातच नव्हे तर सर्व सृष्टींत व परिस्थितींत जमीन अस्मानाचा फरक पडतो. यामुळें पुढील मार्गदर्शनासाठीं कोणींना कोणी तरी श्रेष्ठ विभूती, साधुसंत निर्माण होत असतात. या साधूसंतांच्या शिकवणुकींत आपणास फरक पडलेला दिसतो. पण तो तसा नसतो. गेल्या हजारों वर्षांत होऊन गेलेल्या साधुसंतांचा आचार धर्म जरी भिन्न वाटत असला तरी सर्वांचा मूळ पाया एकच असतो. हजारों वर्षांच्या कालांतही त्यांत फरक पडत नाहीं. भिन्नता असते ती मांडणीत, भाषेंत व आचरणांत; कारण त्या त्या कालाच्या मानवी उत्क्रांतीला पोषक होईल, परिस्थितीस अनुरूप होईल, जनतेला समजेल व पालन करण्यास शक्यांत शक्य सुकर व सोईस्कर होईल, अशी आचारधर्मांची मांडणी व भाषा राखणें हें कार्य उद्देशपूर्तीसाठीं जरूर असते. म्हणून संतासंतांच्या (अवतारीं) सांगण्यांत फरक भासला तर तो केवळ वरचा पापुद्रा होय. औषध आवडीनें घेतलें जावें म्हणून वर पेरलेली ती साखर पण त्याखालील अध्यात्मिक औषध येथून तेथून सारखेंच. श्रीसाईबाबांच्या जीवनांत आरोहात्म अवतारकार्य विशेष दिसून येते. नवीन युगास अनुसरून मानवी बुद्धीस पटेल, पण भविष्यकालीं

येणाऱ्या मानवतेला पोषक होईल, असें मानवी जीवन निर्माण करण्यासाठीं त्यांनीं अध्यात्माची आंखणी केलेली आहे, त्यासाठीं शास्त्रीपंडिती नव्हे तर लोकवाणीचा त्यांनीं उपयोग केलेला आहे. अवरोहात्मक अवताराची पार्श्वभूमी करण्याचें जें कांहीं कार्य त्यांच्याकडे सोपविलेलें असेल तें करतांना फकिरी जीवन जगून व स्वावलंबनाचा मार्ग अवलंबून तपश्चर्येच्या बळावर व सद्‌गुरूच्या साह्यानें मानवाचा देव होऊं शकतो हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. परमेश्वर अव्यक्त चैतन्य—सर्वत्र आहे ही गोष्ट प्रवचनानें नव्हे कीं धार्मिक ग्रंथाच्या आधारें नव्हे तर भक्तांना तसा अनुभव देऊन त्यांना पटवून दिली आहे. पुन्हां हें सर्व करीत असता भक्तांच्या संसारांत त्यांना मदतीचा हात देऊन त्यांच्या आत्म्यांना प्रफुल्लीत करण्याचें आरोहात्मक अवताराचें कार्यही त्यांनीं केलें आहे व आजही करीत आहेत. आरोहात्मक अवतारांत असलेला पंथ परंपरा शिष्यगण यांचा अभावही त्यांच्या कार्यांत आढळतो. अशा प्रकारचें हें अवतारी सामर्थ्य ज्या दिवशीं त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाले, ज्या दिवशीं त्यांच्या शरीर कणाकणांतून ईश्वरी शक्ति प्रगटूं लागली तो दिवस, तें त्यांचें तीन दिवसानंतर होणारे उत्थान पवित्र नव्हे असें कोण म्हणेल? आम्ही तीन दिवस ब्रह्मांडी प्राण चढवितों या साध्या सहा शब्दांच्या पेटींत आतांपर्यंत वर्णिलेला अमृत मेवा त्यांनीं ठेवला असून ती पेटी त्यांनीं दाभोळकराकरवी श्रीसाई सच्चारित्रांत बंद करून आपणांस दिली आहे. ती आपण उघडावी, त्यांत डोकावून पहावें, त्यांतला मेवा सेवन करावा व निष्ठा व तपश्चर्या यांच्या साह्यानें आपल्या भक्तांनीं आज ना उद्यां या नाहीं त्या जन्मीं आपल्याप्रमाणेंच आरोहण करावें, याखेरीज दुसरा कोणता उद्देश असें करण्यांत बाबांचा असूं शकेल?

उत्थान दिन कोणता हें आपण जाणूं शकतों. बाबांचा जन्मदिन जरी अज्ञात असला तरी आपल्या आरोहात्मक अवताराच्या जन्मदिनाची नोंद मोठ्या खुबीनें दाभोळकराकरवी बाबांनी साई चरित्रांत करून ठेवली आहे. रामाची रामनवमी, कृष्णाची कृष्णाष्टमी, तसाच बाबांचा उत्थान दिन. आमच्या अंदाजाप्रमाणें मार्गशीर्ष वद्य तृतीया वेळ रात्रीं दहाचा सुमार हा दिवस बाबांची जयंती म्हणून साजरा केल्यास तें उचीत होणार नाहीं काय?



# स्वामी विवेकानंद–शिष्या

# भगिनी निवेदिता

[ जन्म–शताब्धीच्या निमित्तानें ]

लेखक : पु. बा. कुलकर्णी

भगिनी निवेदिता यांचें नांव आजच्या पिढींतील फार थोड्या लोकांच्या कानांवरून गेलें असेल. मग त्या कोण, कुठल्या व त्यांची जन्म–शताब्धि पुढील वर्षी भारतीयांनीं साजरी करावी अशी कोणती थोर कामगिरी त्यांच्याकडून पार पडली, याची माहिती असणें दूर राहिलें.

भगिनी निवेदिता हें नांव त्यांचे गुरुजी स्वामी विवेकानंद यांनीं त्यांना दिलें. त्यांचे मूळ नांव होतें मार्गारेट नोबल. त्यांचा जन्म आयर्लंड देशांत ता. २८ ऑक्टोबर १८६७ रोजीं झाला. जन्म आयर्लंडमध्यें झाला असला तरी त्यांनीं भारतांत येऊन भारतियांची मनोभावें सेवा करण्यांत सारें आयुष्य घालविलें. भारतियत्व त्यांच्या रोमरोमांत व रक्ताच्या थेंबाथेंबांत भिनलें होतें. भारतीय संस्कृति–भारतीय चालिरीति व जें जें म्हणून भारतीय त्याच्याशीं सर्वतोपरी एकरूप झालेली परदेशीय महिला त्यांच्या तोडीची सांपडणें कठीण आहे.

## सेवाधर्मासाठीं भारताची निवड

हिंदुधर्म, हिंदु पुराणें–शास्त्रें व हिंदु संस्कृति यांचा सखोल अभ्यास त्यांनीं निष्ठापूर्वक केला. त्या भोळ्याभावड्या नव्हत्या. विचारवंत होत्या. त्यांनीं सेवेसाठीं भारतदेशाची निवड केली ती जाणूनबुजून व डोळसपणानें.

एका आयरिश बुद्धिमान् महिलेंत ही क्रांति कशी घडून आली हें पहाण्यासारखें आहे.

यावेळीं त्यांची आठवण होण्याचें प्रमुख कारण म्हणजे पुढील वर्ष हें त्यांच्या पुण्यस्मरणाचें व त्यांच्या जन्मशताब्धीचें आहे.

ज्या परदेशीय महिलेनें ऐन तारुण्यांत व जीवनाच्या वैभव काळांत संन्यास

धर्माची दीक्षा घेऊन स्वतःचें जीवनसर्वस्व भारतीय जनतेच्या सेवेला अर्पण केलें, तिची थोरवी कोणत्या शब्दांनीं गावी !

भारतानें भाग्य थोर म्हणूनच भगिनी निवेदिता ह्यांच्यासारख्या एका निस्सीम सेविकेचा लाभ भारताला झाला !

हा लाभ कधीं, कसा व कोणामुळें झाला हें समजून घेण्यापूर्वी भगिनी निवेदिता यांचें पूर्वायुष्य आपण समजून घेण्याचा प्रयत्न करूं या.

## शिक्षणप्रसार आवडता विषय

आरंभापासून भगिनी निवेदिता सेवाभावानें भारल्या गेल्या होत्या. त्यांचे वडील सॅम्युएल रिचमॉंड नोबल हे वेस्लीयन ख्रिस्त मंदिरांतील एक अधिकारी होते. समाज-सेवा करतां करतां वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी ते परलोकवासी झाले. तीन भांव-डांत मार्गारेट नोबल ( भगिनी निवेदिता ) ह्या सर्वांत वडील. हालिफॉक्स कॉलेजांतील शिक्षणक्रम पूर्ण करून त्यांनीं शिक्षकी पेशा पत्करला. शिक्षण संपादन करणें व शिक्षण देणें हेंच त्यांचें आवडतें कार्य होतें आणि जन्मभर तेंच त्यांनीं केलें. शिक्षणावर त्यांची असीम श्रद्धा होती. मुलांमुलींना उत्तमोउत्तम शिक्षण मिळालें पाहिजे. त्यांच्यातील कर्तृत्वशक्ति जागी झाली पाहिजे व तिला पोषक असें सुशिक्षण त्यांना देण्यांत आलें पाहिजे ही त्यांची दृढ समजूत होती.

त्यासाठीं त्यांनीं शिक्षणशास्त्राचा अभ्यास केला. निरनिराळ्या शाळांत काम करून अनुभवजन्य ज्ञान मिळविलें. मुलांमुलींना शिक्षण देण्यासंबंधीं त्याकाळीं चालू असलेल्या प्रयोगांकडे त्यांचें चौकस दृष्टीनें लक्ष होतें. पेस्टॉलॉझी व फ्रोबेल या दोघांनी त्याकाळीं शिक्षण पद्धतींत क्रांति घडवून आणली होती. त्यांच्या शिक्षण पद्धतींचा त्यांनी अभ्यास केला व तो पचविलाही.

या कार्यातील त्यांचा उत्साह फार दांडगा होता. तो त्यांना स्वस्थ बसूं देणार नव्हता. थोडी साधनसामुग्री जवळ करून त्यांनीं वयाच्या पंचवीसाव्या वर्षी १८९२ सालीं विम्बल्डन येथें मुलांमुलींसाठीं एक शाळा सुरू केली. किती उत्कंठेनें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें या पवित्र कार्याला त्यांनीं वाहून घेतलें !

मुलांच्या मनाचा योग्य दिशेनें विकास करणें ही मानवजातीची फार मोठी सेवा आहे. आणि तीच देवाची सेवा–भक्ति–अशी होती त्यांची दृढ श्रद्धा. शिक्षण, साहित्य हे होते त्यांचे अत्यंत आवडते विषय. खूप वाचायचें, मनापासून चिंतन करायचें आणि त्याचा मनमुराद फायदा मुलांबाळांना करून द्यावयाचा.

## धर्मभावना जाज्वल्य

हें कार्य चालू असतांना त्यांचे देवाधर्माकडेहि लक्ष लागून राहिलें होतें.

प्रचलित धर्म त्यांचें समाधान करूं शकत नव्हता. त्या बाबतींत त्या असंतुष्ट होत्या. धर्म हा बालपणापासून त्यांचा आवडता विषय होता. वडील, मातोश्री धर्मनिष्ठ; मग तो गुण त्यांच्यांत आल्याशिवाय कसा राहील? परंतु चौकस, विचारवंत मनाला ज्या धर्मांत जन्म झाला त्या धर्माचीं सर्वच तत्त्वें त्यांना मानवत नव्हतीं. कुठेंतरी चुकत आहे असें त्यांना वाटत असे.

मग त्यांनीं निरनिराळ्या धर्मांचा अभ्यास सुरू केला. त्यांत बुद्धधर्म त्यांना कांहींसा जवळचा वाटूं लागला. दिवसांमागून दिवस जात होते. मनाची अवस्थाच कांहीं स्वस्थ बसूं देत नव्हती.

इतक्यांत अमेरिकेंत वेदान्त धर्माचा विजय–ध्वज फडकावून स्वामी विवेकानंद हे लंडनमध्यें, तेथील कांहीं मित्रांच्या आग्रहावरून येऊन दाखल झाले. लंडनमध्यें त्यांनीं वेदान्त धर्मावर व्याख्यानें देण्याचा उपक्रम सुरू केला होता.

त्यांच्या व्याख्यानांकडे लंडनमधील धर्म प्रवृत्तीच्या लोकांचें लक्ष वेधूं लागले होतें. मार्गारेट नोबल याही त्यांच्या व्याख्यानांकडे खेचल्या गेल्या.

कोणत्याही गोष्टीची तुम्हांला उत्कंठा लागावी लागते. तहानेनें जीव कासावीस व्हावा लागतो. बेचैनी वांट्यास यावी लागते. झोंप उडून जावी लागते. एकचएक ध्यास मनाला लागावा लागतो.

आणि मग तुमची ती तहान व तुमची जाज्वल्य उत्कंठा ध्यानीं आणून प्रत्यक्ष ईश्वरच तुमचा सहाय्यकारी होऊन तुमची उत्कंठा व तुमची तहान शांत करीत असतो.

स्वामी विवेकानंद यांनीं १८९३ सालीं अमेरिकेंतील शिकागो शहरांत भरलेल्या धर्म–परिषदेंत वेदान्त धर्माची जी परिणामकारक थोरवी, गायिली तिचे प्रतिध्वनि मार्गारेटच्या कानीं पडल्यापासून त्यांना भेटावें असें वाटूं लागलें होतें. जिज्ञासा जागी झाली होती. महापुरुषाच्या संदेशाकडे लक्ष लागून राहिले होतें.

## स्वामी विवेकानंदांची भेट

म्हणतां म्हणतां वर सांगितल्याप्रमाणें स्वामीजी लंडनमध्यें येऊन दाखल झाले. गरीब असोत किंवा बड्यांत बडे असोत. सर्वांना स्वामीजींचें आकर्षण वाटूं लागलें होतें.

लेडी मर्गेसन या नांवाच्या एक धनिक व खानदानी बाई त्या काळीं लंडनमध्यें रहात होत्या. त्या धार्मिक वृत्तीच्या व उदार मतवादी होत्या. त्यांनीं एके दिवशीं स्वामी विवेकानंद यांस आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण दिलें. लेडी मर्गेसन व मार्गारेट नोबल यांची मैत्री होती. मार्गारेटची धर्मजिज्ञासाही त्याना माहीत होती. त्यांनींच

त्या दिवशीं मार्गारेट नोबल व स्वामी विवेकानंद यांची आपल्या दिवाणखान्यांत भेट घडवून आणली. त्या भेटीला ऐतिहासिक दृष्ट्या व भारतीयदृष्ट्या फार मोठें महत्त्व आहे. कारण जिनें अंतःकरणापासून व संपूर्ण श्रद्धेनें आपलें जीवनसर्वस्व भारत सेवेला अर्पण केलें, अशा एका निष्ठावंत सेविकेचा आम्हांला लाभ झाला.

स्वामी विवेकानंद ह्यांचा त्याग, धर्मनिष्ठा, वेदान्ताचा गाढ अभ्यास, त्यांचें अमोघ व हृदयाचा ठाव घेणारें वक्तृत्व व त्यांचें व्यक्तिमत्त्व सर्वच कांहीं आकर्षक होतें. मार्गारेट नोबल यांच्या जिज्ञासू मनाचे ते समाधान करूं शकले.

आयुष्यांत ज्याचा आपण शोध करीत होतों व ज्याची आपणाला तहान लागली होती तो अमृत–कुंभ सांपडला एकदांचा, असें मार्गारेटला वाटलें; परंतु तरीहि त्यानीं एकदम शरणागती पत्करली नाहीं. आणि स्वामीजीनाही आपल्या पंथांत ज्या कोणास यायचें असेल त्यानें किंवा तिनें पूर्ण विचार करून यावें असें वाटत असे. तशी त्यांनी मार्गारेटला जाणीवही करून दिली.

इंग्लंडमधील दौरा संपवून स्वामी विवेकानंद परत अमेरिकेंत अपुरें राहिलेलें आपलें कार्य पूर्ण करण्यासाठीं निघून गेले. तो काळ वर्ष दोन वर्षांचा असावा. या काळांत मार्गारेटला साधकबाधक रीतीनें विचार करायला जरूर तो कालावधि मिळाला.

**स्वामीजींकडून समज**

आणि शेवटीं स्वामी विवेकानंद हेच आपले परम गुरुजी असें मार्गारेट नोबल यांनी निश्चित ठरविलें. स्वामीजी अमेरिकेहून परतले तेव्हां त्यानी त्यांची भेट घेऊन आपला निर्धार प्रणामपूर्वक त्यांच्यापुढें ठेविला तेव्हां स्वामाजीनीं त्यांचा एकदम स्वीकार केला नाहीं. त्यांची परोपरीनें कसोटी लावून पाहिली. त्यानीं सांगितले कीं, मनापासून मानव जातीची सेवा करायची असल्यास विवाहाच्या फंदांत पडतां येणार नाहीं. कडक ब्रह्मचर्य व्रत पाळावें लागेल. सुखोपभोगावर लाथ मारावी लागेल. भारतांत अज्ञान, दारिद्र्य व रोगराई सर्वत्र स्वैरपणें बोकाळलेली आहे. तेथें निष्ठावान् सेवक सेविकांची जरूरी फार आहे. परंतु सर्व सुखांचा त्याग करून सन्यस्त वृत्तीनें त्यांच्यांत वावरावे लागेल. आपल्याजवळ सदाचाराचें व सद्विचारांचें गाठोडें पाहिजे. नीतिधर्मानें वागतां आलें पाहिजे.

अशा अनेक गोष्टी स्वामीजींनीं मार्गारेट नोबल यांच्या कानावर घातल्या. त्यांना उत्तेजन देण्याऐवजीं निरुत्साहीच करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्यांच्यापासून कोणतीहि गोष्ट लपवून ठेविली नाहीं. तो मोकळेपणा व एकप्रकारचा निखालस कठोरपणाच मार्गारेट नोबल याना आकर्षक वाटला.

स्वामी विवेकानंद यांचें शिष्यत्व संपूर्णपणें पत्करून व ' करिष्ये वचनं तव

या भावनेनें त्यांच्या नेतृत्वाखालीं भारतीय जनतेची एकनिष्ठपणें सेवा करण्याचा मार्गारेट यांचा निर्धार झाला व तो त्यांनीं स्वामीजींच्या चरणीं भक्तिभावपूर्वक ठेविला.

मार्गारेट नोबल ह्या भगिनी निवेदिता या नांवानें स्वामी विवेकानंद यांच्या मिशनमध्यें दाखल झाल्या. त्यांनीं १८९८ च्या अखेरीस आपली जन्मभूमी सोडिली व आपल्या कर्मभूमीकडे स्वेच्छेनें व सेवाभावाच्या उत्कंठेनें प्रयाण केलें.

## कलकत्त्यांत आगमन

ता. २८ जानेवारी १८९८ रोजीं भगिनी निवेदिता यांचें कलकत्ता नगरींत आगमन झालें. इंग्लंडहून आणखी दोन शिष्या त्यांच्याबरोबर आल्या. कलकत्त्या-जवळ श्री रामकृष्ण परमहंस यांचा बेलूर मठ आहे. त्याच्याजवळच एक ठाकठीक झोंपडी त्यांना बांधून देण्यांत आली. तेथें ती मंडळी राहूं लागली. त्याच वर्षाच्या ता. २५ मार्च रोजीं भगिनी निवेदिता यांस ब्रह्मचर्याची विधीपूर्वक दीक्षा देण्यांत आली आणि तेव्हांपासून त्यांचें नवीन अध्ययन व अध्यापन कार्य उत्साहपूर्वक सुरू झालें.

आरंभकाळांत स्वामी विवेकानंद यांचें त्यांच्या एकंदर हालचालींवर व अभ्यासक्रमावर बारकाईनें लक्ष असे. अलमोरा, काश्मीर वगैरे ज्या ज्या भागांत स्वामिजी कार्यपरत्वें गेले त्या त्या ठिकाणीं त्यांनीं भगिनीला आपल्याबरोबर नेलें. सुमारें सहा महिन्यांचा काळ हिंडण्याफिरण्यांत, पहाण्यांत, चर्चा करण्यांत गेला आणि त्यानंतर भगिनी निवेदिता यानीं कलकत्ता येथें माता श्री शारदादेवी (श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या धर्मपत्नी) यांच्या सान्निध्यांत किंवा त्यांच्या जवळपास राहून आपलें कार्य सुरूं केलें.

यापूर्वीच सांगितल्याप्रमाणें भगिनी निवेदिता यांचें सर्वांत आवडतें कार्य जर कोणतें असेल तर तें म्हणजे शिक्षणप्रसार हेंच होय. दौऱ्याहून कलकत्त्यांत परत येतांच त्यांनीं कलकत्ता येथील 'बागबाजार' या भागांत मुलींसाठीं एक शाळा सुरू केली. तिचें उद्घाटन माता श्री शारदादेवी यांच्या हस्तें झालें. मातेचा आशीर्वाद त्या शिक्षण संस्थेला लाभला हें केवढें मोठें भाग्य!

## मुलींसाठीं शिक्षणसंस्था

परंतु नंतरच्या काळांतील अनेक अडचणींमुळें ही संस्था दीर्घकाळ चालू शकली नाहीं. कांहीं महिन्यांतच ती बंद करावी लागली. स्वामीजी युरोप-अमेरिकेच्या दौऱ्याबर पुन्हां निघावयाचे होते. त्यांच्याबरोबर त्यांची एक सहाय्यक या नात्यानें भगिनी निवेदिताहि त्यांच्याबरोबर गेल्या. या दौऱ्यावरून स्वामीजी १९०० सालीं भारतांत परत आले व कांहीं काळ स्वदेशीं राहून भगिनी निवेदिताही परत आपल्या कर्मभूमींत येऊन दाखल झाल्या.

स्वामी विवेकानंद यानीं त्यांना एकंदर कार्याची दिशा दाखवून व आखून दिली होती. जें कांहीं सांगायचें तें सांगून झालेलें होतें. स्वामीजींनीं ता. ४ जुलै १९०२ रोजीं इहलोकींची यात्रा संपविली.

स्वामीजींच्या सहवासास व मार्गदर्शनास भगिनी निवेदिता मुकल्या. तें भाग्य फार थोडा काळ त्यांना लाभलें; ते जग सोडून गेले असले तरी मागें राहिलेल्यांनीं त्यांचा संदेश फैलावयाचा व त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें वाटचाल करावयाची हें होतें भगिनींचें आमरण धोरण "स्वामीजी गेले ! ते गेले कसले ? ते आम्हांला सोडून जाणें कधींहि शक्य नाहीं. ते सदैव आमच्यांतच वावरत आहेत. ते गेले असें मला कधींही वाटलें नाहीं. ते सतत आमच्याबरोबर आहेत, असेंच मला वाटलें. आम्हीं दुःख करीत नाहीं बसायचं. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सतत कार्य करीत रहायचं. हेंच आपलें जीवनकार्य व त्यांतच आमचा मोक्ष आहे." असें त्या नेहमीं म्हणत असत व स्वामीजीपासून जो दिव्य प्रकाश मिळाला त्या प्रकाशांत सदैव वावरत असत.

## भारताला स्वातंत्र्याची जरुरी

भगिनी निवेदिता स्वामीजींच्या मागें खचून गेल्या नाहींत. यानंतरच्या काळांत दुप्पट उत्साहानें त्या कार्यास लागल्या. स्वामीजींच्या दुसऱ्या एक शिष्या खिस्ताईन ह्या त्यांना येऊन मिळाल्या. लहान मुलींसाठीं पूर्वी एक किंडरगार्टन शाळा सुरू केली होती. तिलाच जोडून व्यापक स्वरूपाची म्हणजे लहान मुलींप्रमाणें मोठ्या मुलींनाही शिक्षण देणारी एक आदर्श शिक्षण संस्था सुरू करण्यांत आली. ही संस्था पुढें बरीच नांवारूपास आली व आजही भगिनी निवेदिता यांच्या नावें ती चालू आहे.

ही शिक्षण संस्था एवढेंच त्यांचें कार्यक्षेत्र नव्हतें. त्यांचें कार्यक्षेत्र फार मोठें व व्यापक होतें. त्या व्यापक क्षेत्रांत त्या सदासर्वकाळ निमग्न असत.

परदेशांत जन्म झालेला व स्वामीजींबरोबर अनेक स्वतंत्र देशांतून त्यांनीं प्रवास केला होता व त्या त्या देशांतील लोकांची रहाणी, जीवनमान, स्वतंत्र बाणेदार-पणा, प्रगती वगैरे सर्व पाहून भगिनी निवेदिता यांच्या मनावर एक ठसा कायमचा उमटलेला होता. तो कोणता ? कोणत्याही देशांतील जनतेची धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक वा राजकीय प्रगति पारतंत्र्याच्या काळांत होऊं शकत नाहीं. तेव्हां राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची आत्यंतिक जरुरी आहे. त्यासाठींही आपण झटणें जरूर आहे, असें निवेदिता यांस तीव्रतेनें वाटूं लागलें. मग त्यासाठीं त्यांनीं काय केलें ?

( पुढील अंकी समाप्त )

# बोधलेबुवांचें बोधप्रद जीवन

## ( उत्तरार्ध )

कपटाचरणी लोकांच्या कारस्थानास कवडीचीहि किंमत न देणारा बोधला रामनामाची प्रौढी सांगूं लागला. तो म्हणाला, "हरिनामाची ख्याती अनुपम आहे. हें नाम फुकटचें असून अति पवित्र आहे. याची गोडी अमृताहून अधिक आहे असें मी अनुभवानें सांगतों. तरी सर्वजणांनीं टाळी पिटून नामाचा गजर करावा."

बोधल्याच्या आज्ञेप्रमाणें सर्वत्र विठ्ठल शब्दाचा ध्वनि उमटूं लागला, तेव्हां ते राळेरासकर बोधल्यास म्हणाले, "हा आमच्या शेजारी बसलेला गृहस्थ नामगर्जना करीत नाहीं."

तो मनुष्य मृत आहे याविषयीं बोधल्याची कल्पनाहि नव्हती. कुटिलांचें बोलणें सत्यच धरून बोधला त्या प्रेतास उद्देशून बोलूं लागला कीं, "बापा नरदेहास येऊन हरिनामाचा उच्चार करण्यास किमपि आळस करूं नको. टाळ्या वाजवून व उल्हास धरून मुखानें खुशाल नामघोष कर."

बोधल्याच्या या उक्तीनें पांडुरंग विचारांत पडले. त्या प्रेतानें नामोच्चार केला नाहीं तर बोधल्याच्या मनास विक्षेप होईल या चिंतेनें पांडुरंगांनीं तें प्रेत सजीव करण्याबद्दल यमधर्मास आज्ञा केली. श्राद्धदेवाच्या कृपेनें तें प्रेत उठून बसून हरिनाम उच्चारूं लागलें. त्या सजीव झालेल्या मनुष्यानें स्वयंस्फूर्तीनें धांवत जाऊन बोधल्याच्या पायास मिठी घातली. तो प्रकार पाहतांच त्याच्या सांगात्यांनीं बोधल्याला सर्व मजकूर समजावून दिला. तो मजकूर ऐकतांच सर्वत्र टाळ्यांचा ध्वनी दुमदुमून राहिला. भक्तमंडळी आनंदित झाली. बोधल्याच्या डोळ्यावाटे अश्रुधारा वाहूं लागल्या; बोधला सप्रेम होऊन देवास म्हणाला, "परमेश्वरा, माझें मन विक्षेप पावूं नये म्हणून तूं ही केवढी लीला दाखविलीस! अन्नामध्यें माती पडली असतां बालकास न समजतांच त्याची आई ती परस्पर काढून टाकिते त्याप्रमाणें भक्तांच्या विघ्नांचें तूं परस्परच निवारण करतोस, ही तुझी अगम्य लीला आहे."

इतकी स्तुति केल्यानंतर मंगळ आरति ओवाळण्यांत आली. कीर्तन समास होऊन लोक आपापल्या वाटेनें निघून गेले. हा प्रेतसंजीवनाचा प्रकार पाहून हांसीचें चित्त बोधल्याच्या चरणीं अधिकच रत झालें.

दर एकादशीला धामणगांवीं जाऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरीं परत जावयाचें असा क्रम हांसीनें तीन वर्षें चालविला. ती साधक बनली असें पहातांच तिच्या मार्गांत आडकाठी करण्याकरितां विघ्नांनीं कंबर बांधली. दुधानें भरून ठेवलेलें भांडें लवंडण्याकरितां जसें मांजर टपून बसतें; आजाऱ्याकडून कुपथ्य होण्याबद्दल जसे रोग वाट पाहत बसतात; योग्याला गुंतविण्याकरितां जशा सिद्धी तत्पर बनतात; चंद्राला ग्रहण लावण्याची संधी साधण्यास जसा राहू टपलेला असतो, त्याप्रमाणें हांसीच्या ईश्वरभक्तींत संचार करण्याकरितां टपून बसलेल्या विघ्नांनीं आपला डाव साधला.

ज्या दोन भावांच्या घरीं हांसी चाकरीस होती, त्या दोघां भावांनीं विभक्त राहण्याचा बेत ठरविला. सर्व जिनसांच्या बरोबर वाटण्या झाल्या. पण हांसीची निमे-निम वाटणी कशी करावयाची ? त्यांनीं हांसीची विक्री करण्याचें ठरविलें. गांवांमध्यें या गोष्टीचा बोभाट होऊन ती बातमी हांसीला समजली. तिला त्याबद्दल मोठा विचार पडला. कामधंदा आटोपुन ती मोठ्या धांदलीनें धामणगांवास बोधल्याकडे गेली. बोधल्याचे चरण धरून ती गहिंवरानें रडावयास लागली. तिची खेदनीय अवस्था पाहून बोधल्यानें तिला तिच्या चिंतेचें कारण विचारिलें. हांसीनें त्याला आपल्या विक्रीचा मजकूर सांगून त्याच्या कीर्तनाच्या वियोगाबद्दल दुःख प्रदर्शित केलें. तिला सागर आणि तरंग यांचा दृष्टांत देऊन बोधल्यानें तिचें समाधान करण्याचा यत्न केला. आनंदसागर अशा पांडुरंगाचेंच सर्व जीव हे तरंग असल्याकारणानें अंतरंगांत हरिध्यान करणाराच्या आनंदांत वियोगदुःखानें कमीपणा येत नाहीं अशा अर्थाच्या उपदेशानें हांसीचें समाधान झालें नाहीं. बोधल्यासारख्या भगवद्भक्ताच्या वियोग होणार या कल्पनेनेंच ती व्याकूळ झाली होती. बोधराजाची गांठ घेतल्यनंतर हांसीनें ममताईला आपला वृत्तांत समजावून दिला. ममताईनें आपल्या भावाजवळून आपणास विकत घेऊन स्वतःच्या चाकरींत ठेवावें अशी हांसीनें आपली इच्छा प्रगट करून दाखविली. ममताई व बोधराज यांचा विचार होऊन हांसीला विकत घेण्याचें ठरलें, तिच्या मोबदल्याचें धन भरविण्याकरितां बोधल्यानें धामगांवचें आपलें वतन विकावें असें ठरलें. आपण मागाहून येण्याचें वचन देऊन बोधल्यानें हांसीस पुढें पाठवून दिलें. वणवा पेटला असतांना मेघवर्षाव व्हावा, त्याप्रमाणे बोधल्याचे अमृतवचन ऐकून त्या पाळलेल्या हासीला टवटवीतपणा आला. ती राळेरासीस चालती झाली. मागाहून बोधलाही तेथें गेला. त्यानें आपल्या मेहुण्यांना हांसीच्या विक्रीबद्दल प्रश्न केला. त्यांचा होकार ऐकतांच बोधल्यानें हांसीला विकत घेण्याची तत्परता दाखविली.

बोधल्याची इच्छा समजतांच त्याचे दोन्ही मेहुणे संतापले. सोयऱ्याधायऱ्यांच्या घरीं आपलें मनुष्य विकणें हें त्यांना अपमानकारक वाटलें. ते अटीला लागले.

बोधल्याच्या घरांत हांसी विकण्यापेक्षां आपण तिला दुसऱ्या कोणास फुकट दान करूं असें त्यांनीं गर्वानें सांगितलें.

आपल्या बन्धूंचा निश्चय कळतांच हांसी मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागली. बोधल्यानें तिला आपल्या घरीं आणण्याचें अभिवचन देऊन तिचें समाधान केलें आणि तो धामणगांवीं परत गेला.

कांहींतरी सामर्थ्याचा उपयोग करून बोधला आपलें वचन सत्य करून दाखविण्याकरितां हांसीचा घातही करील अशा दुर्भावानें या बंधुद्वयानीं हांसीला विकायची धांदल केली. त्यानीं दुसरेंच एक गिऱ्हाईक गाठून हांसीला तिच्या कन्येसह पंचवीस होनाला विकले.

गिऱ्हाइकांनीं पंचवीस होन मोजून हांसीचें खरेदीपत्र लिहिलें. आतां आपणांस भलतेच गृहस्थ घेऊन जाणार अशी खात्री वाटून तिनें मनामध्यें विठोबाची प्रार्थना चालविली. बोधलेबुवानें आपणास वचन दिलें आहे तें सत्य होण्याकरितां विठ्ठलानें धूम ठोकली नाहीं तर कोणत्यातरी उपायानें आपण आपला घात करून घ्यावयाचा, असा आपला निश्चय तिनें पांडुरंगाला कळविला. तिचें मानस जाणून परमात्म्यानें विप्रवेष धारण केला, आणि तो त्या बंधुद्वयाच्या अंगणांत येऊन उभा राहीला.

हांसीचे खरेदीदार तेथून उठण्याच्या विचारांत आहेत तों त्या विप्राने हांसीस हांका मारून तिला बोधराजानें बोलाविलें असल्याचें सांगितलें. त्या ब्राह्मणाची वाणी ऐकतांच हांसीला आनंद झाला. तिनें धांवत जाऊन त्या विप्राच्या चरणाला मिठी मारिली. तिला तशीच परत ओढण्याकरितां तिचे खरेदीदार उठणार तोंच तो विप्र, हांसी व तिची कन्या जागच्या जागीच अदृश्य झाले.

हा चमत्कार पाहतांच ते व्यापारीबंधू व खरेदीदार यांना आश्चर्य वाटलें. आश्चर्याचा काळ संपल्यावर खरेदीदार आपले होन परत मागूं लागले. ते दोघे बंधू, व्यवहार पटून गेल्यानंतर हांसी गुप्त झाली, अशा मुद्यावर पैसे नाकारूं लागले. त्यांचें मोठेंच भांडण जुंपलें. अखेर तडजोड होऊन त्यांच्या दरम्यान असा मुद्दा निघाला कीं, ज्या अर्थी बोधल्याच्या निरोपावरूनच ती हांसी अंगणांतील ब्राह्मणाकडे जाऊन नाहीशी झाली. त्याअर्थी तिच्या खरेदीदारांनीं बोधल्याकडे जाऊन आपले होन भरून घ्यावेत.

बोधल्याचा व हासीचा पूर्वीचा वृत्तांत खरेदीदारास ठाऊक असल्यानें ते बोधल्याशीं वाद घालण्यास तयार होईनात. ते त्या दोन्ही भावाजवळच होनाबद्दल भांडत बसले. वादाचें कारण जी हांसी ती आपल्या जन्माचें सार्थक करून उद्धरून गेली ही गोष्ट त्या वादप्रिय व विषयलोलुपजनांच्या ध्यानांतहि आली नाहीं. आपलें सर्व चातुर्य खर्चून कंटाळा येईपर्यंत त्यांनीं नुसता वादच चालू ठेविला.

बोधल्याचा लौकिक ऐकून त्याच गांवांतील एक अंत्यज त्याच्याकडे जाऊन उपदेश मागूं लागला. बोधल्यानें त्यास सांगितलें कीं. "पंढरीनाथाच्या आज्ञेवांचून मी कोणाला उपदेश देत नाहीं. देवाला विचारून मग मी काय तें करीन." असें सांगून बोधला ध्यान धरून बसला. तो अंत्यज भाविक आहे असें समजून बोधल्यानें देवाजवळ त्याची शिफारस केली. पण पांडुरंगांनीं त्याला सांगितलें कीं, "नीच मनुष्याला आपण कधींही उपदेश देऊं नये. जातीहीनत्व हाच कांहीं मोठा दोष नाहीं. पण ज्याला उपदेश द्यावयाचा त्याचा अधिकार पाहणें इष्ट आहे. ज्याचें मन नेहमीं अविश्वासानें भरलेलें आहे, शास्त्र श्रवणाबद्दल ज्याला प्रेम नाहीं, त्याच्यावर अनुग्रह करूं नये. पुस्तकाची फलश्रुति पाहूनच जो कामनिक अवर्तनें करण्याची इच्छा धरितो त्यास उपदेश देऊं नये. मनामध्यें चेष्टेची बुद्धि धरून जो वाचकाला भलतेच प्रश्न करितो अशा पृच्छकावर कृपादृष्टि ठेवूं नये. शिष्य सज्ञान, विरक्त, भाविक व प्रेमळ असला पाहिजे. तूं ज्या अत्यंजाविषयीं प्रश्न काढला आहेस तो परमनष्ट, चांडाळ व कुमति आहे. तुला माझ्या म्हणण्याची सत्यता पहावयाची असेल तर उद्यांक तुझ्या शेतांतील खळ्यावर रासपूजा आहे! त्या प्रसंगीं त्या अत्यंजाकडून तूं बैल मारीव. त्याच्याकडून जर कृपालोप झाला तर तूं त्याच्यावर अनुग्रह कर."

ईश्वराची आज्ञा प्रमाण मानून बोधला हिंसाकर्मास तयार झाला. त्यानें त्या अंत्यजास बोलावून राशीवर बैल कापण्यास सांगून ती गोष्ट गुप्त राखण्याची ताकीद दिली. अंत्यजानें बैल मारिला. त्या बैलाचें मांस शिजवून, भात, भाकरी वगैरे जिन्नस बोधल्यानें दुसऱ्या एका घरी तयार करविले. राशीची पूजा करण्याकरितां बोधल्यानें आपले सोयरेधायरे, गोत्रज व इतर आप्त बोलाविलें. सर्वांना भात, भाकरी, मांस देतांच त्यांना बोधल्याची वृत्ति ढासळल्याबद्दल आश्चर्य वाटलें. बोधल्यानें दिलेलें मांस बकऱ्याचें नसून बैलाचें असेल असा त्यांना मुळींच संशय आला नाहीं. ते सर्व लोक यथास्थितपणें जेवून आपापल्या घरीं गेले. बोधल्यानें त्या महारास सांगून कापलेल्या बैलाचें डोके राशींत लपवून ठेवण्यास सांगितलें. त्याचें कातडें भुसांत गाडून टाकिलें.

बोधल्यानें आपणाकडून जें गुप्त कृत्य करविलें तें बाहेर फोडल्याबद्दल त्या महारास मोठा उल्हास उत्पन्न झाला. दिवस उगवतांच तो दुराचारी गांवांत गेला. घरोघरीं भाकरी मागण्यासाठीं फेरी करीत असतां तो महार कुणब्यामध्यें मिसळूं लागला. तो अत्यंज आहेसें पाहून कुणबी लोक त्याला दूर सारूं लागले. तेव्हां तो त्यांना बोलला, "तुह्मा आह्मांत आतां काय भेद राहिला आहे? काल बोधल्यानें मजकडून बैल मारविला, आणि तें मांस तुम्हीं सर्वांनीं यथेष्ट खाल्लें.

महारानें दिलेल्या बातमीची गुणगुण सर्व गांवभर पिकली. बोघल्यानें मोठें अनुचित कर्म केलें; त्यानें आपलें गोत बाटविलें असा त्याच्यावर गांवकऱ्यांनीं दोषारोप केला. त्याचे सोयरेधायरे एका ठिकाणीं जमून त्या महाराजवळ बैलाच्या मुद्देमालाबद्दल चवकशी करूं लागले. महारानें राशींतील मुणकें व भुसांतील कातडें यांची हकीकत सांगितली. ती ऐकून सर्व मंडळी संतापून बोधल्याच्या प्राणावर उठली. त्या दुर्जनांनीं हातांत डांगा घेऊन बोधल्याच्या भोंवतीं गराडा दिला.

यावेळीं बोधला नेत्र मिटून नामस्मरण करीत होता. त्याला मोठ्यानें पुकारून ते दुर्जन म्हणाले, "बोधल्या, सावध हो; आम्हीं तुला ठार मारण्याकरितां आलों आहों. तूं असा कसा मांग निपजलास! आम्हांला बैलाचें मांस खायला घातलेंस त्याची तुला लज्जा कशी वाटली नाहीं!"

याप्रमाणें गहजब उडवून त्यानीं त्या महाराला मुद्देमाल हजर करण्याची इशारत दिली. आतां आपणावर भ्रष्टाकारचा आरोप शाबीद होणार या भयानें बोधला पांडुरंगाचा धांवा करूं लागला. गांवकरी लोक बोधल्याला त्याचा बैल कोठें आहे म्हणून विचारूं लागलें इतक्यांत तो महार आपल्या हातांत बोकडाची मुंडी व बोकडाचें कातडें घेऊन तेथें आला. त्यानें दुर्मुखेपणानें सांगितलें कीं, 'मीं आपल्या हातानें बैल कापून त्याचें डोकें व कातडें राशींत पुरलें होतें. पण आतां त्या ठिकाणीं हें बोकडाचें डोकें व कातडें सांपडलें. हा काय चमत्कार आहे पहा!" इतक्यांत लोकांनीं बोधल्याच्या गोठ्यांत जाऊन पाहिलें तों तेथें त्याचा बैल जसाच्या तसाच उभा असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां तो सर्व लपंडाव महाराचा आहे असें मानून तें त्या महारासच मारण्यास उद्युक्त झाले. महारानेंच बोधल्यावर तुफान घातलें म्हणून ते त्याच्यावर संतापले. तो महार थरथर कापून आपल्या अपराधाची क्षमा मागूं लागला. गावकऱ्यांचा मार चुकविण्याकरितां त्या महारानें बोधल्यापुढें दंडवत घातला. बोधल्यानें करुणा धरून गांवकऱ्यांचें निवारण केलें. सर्व मंडळी बोधल्याचा अधिकार जाणून आनंदानें परत गेली. शिष्य होण्याची इच्छा करणाऱ्या महाराची परीक्षा बरोबर पटली यावद्दल बोधला प्रेमानें भजन करूं लागला.

पुढें कांहीं काळानें अवर्षण पडून धामणगांवांतील अन्न धान्याची पेरणी राहिली. कार्तिकमासीं स्वातीचा पाऊस बराच पडला; म्हणून बोधल्यानें कर्ज काढून पेरण्याकरितां धान्य खरेदी केलें. पेरणी करण्याकरितां तो रानांत गेला. तों येथें कार्तिकीच्या यात्रेकऱ्यांची दाटी जमली. दुष्काळामध्यें बोधला अन्नदान करितो या कीर्तिनें संतजन तेथें जमले होते. त्यांनीं बोधल्याजवळ अन्नाची याचना केली. निर्जीव भूमीच्या पोटांत धान्य पेरलें असतां ती जर मुबलक पीक देतें तर या सजीव संतांच्या पोटांतच सर्व बीज पेरलें असतां काय प्राप्त होईल न कळे; असें भावून आणि

संतजनांना विन्मुख लावल्यानें सत्वहानि होईल असें जाणून बोधल्यानें तें सर्व धान्य आपल्या मुलाबरोबर घरीं पाठवून दिलें आणि संतांना अन्न संतर्पण केलें.

अन्नदानामध्यें सर्व बी खर्चून गेलें तेव्हां बोधल्यानें आपल्या शेतांत कडू भोपळ्याच्या बियाचीच लागण केली. परमेश्वरी कृपेनें त्या भोपळ्याच्या वेलास अतोनात फळें लागली. बोधल्याची विपरीत करणी पाहून ग्रामवासी लोक हसू लागले. त्यांनीं त्याची चेष्टा आरंभिली. कांहीं कुटिल लोक म्हणूं लागले कीं, "माणकोजी बोधला हा गांवचा राजा असून आम्ही सर्व प्रजा आहों. या दुस्काळांत तो राजा उदार होऊन आम्हां सर्वांच्या हातांत यांतील एकेक भोपळा देणार आहे."

त्याच्या शेतांत जाऊन त्याची थट्टा करण्याकरितां कांहींजण तेथें जमले. त्यांतल्या एकानें शेतांतील एक भोपळा तोडून चिरला, तों त्यांत उत्तम गहू निघालें. तो चमत्कार पाहून सर्वांना परमेश्वराच्या लीलेचें कौतुक वाटलें.


हा प्रकार घडण्याच्या वेळीं त्या ठिकाणीं बादशहाचा हवालदार हजर होता. त्यानें ती बातमी बादशहास कळविली.बादशहाला तें सर्व गारुड वाटून त्यानें लागलीच धामणगांवला पांच ढालाईत रवाना केलें. त्यांनीं बोधल्याला पकडून बादशहापुढें नेऊन उभे केलें. बादशहानें क्रोधायुक्त होऊन बोधल्याला कडू भोपळ्यांतून गहूं कसें निघालें तें सांगण्याबद्दल दरडावून विचारलें. त्या हरिभक्तानें 'तो सर्व हरीचा प्रताप आहे' असें सांगितलें. त्याच्या भाषणावर बादशहाचा विश्वास बसेना. बादशहा अधिकच संतापून त्यानें बोधल्याला यवन करण्याचा हुकूम सोडला. बोधल्यास बाट-विण्याकरितां बादशहानें यवनांकडून मांसकण आणवून बोधल्यास जेवावयास बसविलें. बोधल्यानें ताटाकडे पाहिलें तों त्याच्या तुळशी झाल्या. तें पाहतांच बादशहानें बोधल्यास नमस्कार घातला. बादशहा प्रसन्न होऊन बोधला जें काय मागेल तें देण्यास तयार झाला.

बादशहाचें औदार्य पाहून बोधला म्हणाला, "मला आपल्याजवळून कांहीं घेण्याची इच्छाच नाहीं. ज्याच्या गोठ्यांत कामधेनू बांधली आहे त्यानें दारोदारीं काय म्हणून हिंडावें ? ज्यांच्या अंगणांत कल्पतरू लाविलेला आहे त्यानें सिंदीवनांत जाण्याची हौस कशाला धरावयाची ? ऐरावताचा त्याग करून खरारोहण करणारास कोणी शहाणा म्हणेल कां ? आंब्याची सावली सोडून हिंवराचा आश्रय काय म्हणून करावा ? नरजन्माला कंटाळून पशुजन्म प्राप्त होण्याची इच्छा करणें प्रशस्त आहे काय ? हरिकीर्तन सोडून तमाशाला कोण बरें धांवेल ? घरामध्यें दह्यादुधाची रेलचेल असतां ताकं मागीत काय म्हणून फिरावें ? ज्यांनीं परमहंस दीक्षेचा स्वीकार केला ते गृहस्थाश्रमाकडे कधींही वळत नाहींत; त्याप्रमाणें ज्यांचे अंतःकरण रामभजनीं जडून गेलें आहे. त्यांना भोगविलासाची मुळीच जरूरी नाहीं."

इतकें सांगून बोधला धामणगांवी परत गेला. देव आणि भक्त हे परस्परांच्या प्रेमभावांत देव–भक्त–पण विसरतात या नियमास अनुसरून, ईशभजनाच्या एकतानेंत बोधला आपलें भक्तपणही विसरून गेला. त्याचा अहंकार नष्ट होऊन तो अद्वयानंदांत निमग्न झाला. नानाप्रकारचीं चरित्रें दाखवून त्यानें जडमूढांचा उद्धार केला. एका सद्भावाच्या पाठबळावर पाटलानें–त्या माणकोजी जगतापानें–त्यानें बोधल्यानें–त्या पांडुरंगाच्या अनन्य भक्तराजानें–आपल्या धामणगांवासच भूवैकुंठाचें स्वरूप आणून दाखविलें.


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल, शिर्डी

शिर्डी ऑफिसांत जमा ( रोखीनें ) दि. १-७-६६ ते ३१-१०-६६ या काळांत जमा झालेल्या देणग्यांची साभार पोंच.

| | | रु. | पैसे |
|---|---|---|---|
| श्री. जी. एस. थापर | देवळाली कँप | १०१ | |
| ,, पी. यू. कुरेकार | वरोरा | १०० | |
| ,, सी. पी. पटेल | मुंबई | ५१ | |
| ,, जी. ए. भट्ट | मुंबई | ५१ | |
| ,, के. एच. ॲण्ड सन्स | आफ्रिका | ५० | |
| ,, एस. विश्वनाथ | मुंबई | २०० | |
| ,, आय. ए. अमोलकराज | मुंबई | २७ | |
| ,, बी. एस. डिंग्रा | मुंबई | ११ | |
| ,, गंगाधर रामचंद्र | मुंबई | २० | |
| ,, आर. बी. शहा | मुंबई | ५१ | |
| ,, दुर्गाबाई यनफडी | ,, | ५ | |
| ,, शामदास वधवा | ,, | ५१ | |
| ,, अन्ना राडर | हैद्राबाद | ५० | |
| ,, वाय. बी. रमनगौंडावर | धारवाड | १०१ | |
| ,, बी. बी. मालीपाटील | रायचूर | ८१ | |
| ,, एम. डी. मालीपाटील | ,, | ११२ | |
| ,, पी. बी. रायन्नगोडवार | धारवाड | १० | |
| ,, एम. के. अफूवाला | मुंबई | २१ | |
| ,, ए. एस. बलसारा | ,, | ७० | |
| ,, टी. जी. पार्वतीबाई | मद्रास | ५० | |
| ,, साईनाथ मेडीकल हॉल | नांदेड | ५ | |
| ,, बी. पी. दत्त | न्यू दिल्ली | ५ | |
| श्रीमती लक्ष्मीबेन | मुंबई | ५ | |
| कावल शांतीकुमार | इंदोर | ५१ | |
| श्रीमती उर्मिला गुप्ता | ,, | ७ | |
| श्री. डी. एच. ठक्कर | मुंबई | २१ | |

| | | |
|---|---|---|
| पी. विठ्ठलदास आणि कंपनी | मुंबई | १०१ |
| श्री. अशोक ताटे | ,, | १०० |
| ,, एच. सेठ | रायपूर | १० |
| ,, डॉ. एन. एल. रॉय | पोरबंदर | १०० |
| | | १६११ |
| श्री. सी. पी. पटेल | मुंबई | ५१ |
| ,, सुवर्ण नार्वेकर | कारवार | २२५ |
| ,, शरद गजानन रणदिवे | मुंबई | २५ |
| ,, मिस ललीता | अहमदाबाद | २० |
| श्री. नाणावटी | मुंबई | ५ |
| ,, श्री. सेठ | ,, | ६ |
| जगूबाई | ,, | २ |
| के वेकंटेश्वरराव | राजमुंद्री | १० |
| माधव भट | मुंबई | ५ |
| | | १९६८—०० |

रु. एक हजार नऊशें अडुसष्ट फक्त

| | | |
|---|---|---|
| मिसेस क्रांती नातू | सिमला टेकडी | ९ |
| श्री. रामचंद्र | इन्दौर | ६ |
| ,, बेहार मोनलाल | अहमदाबाद | ३६ |
| ,, केशवराव किरवाई | राजापूर | ३५ |
| ,, सुरेंद्र संतुराम कोरडे | डोंबीवली | २० |
| ,, रत्नाबाई म. तानक | मुंबई २ | ११ |
| मेजर व्ही. एस. पंडीत | C/o. ५६ ए. पी. ओ. | १५ |
| श्री. टी. आर. पंडीत | मुंबई १ | ५० |
| ,, ए. बी. पाटील | कोल्हापूर | ५ |
| ,, रामचंद्र | इन्दौर | ६ |
| ,, बलवंत आर. वर्मा | कानपूर | १० |
| ,, विजयकुमार वेणी | महाबुतनगर | १० |
| मेजर व्ही. पी. नातू | अलाहाबाद | १० |
| Flt Sgt दिके. के. डब्ल्यु | मद्रास | ५ |
| श्री. दशरथ अप्पान्ना गुरव | गोखरपूर | ५ |
| ,, सी. एन. पराशार | शेसपूर | ५ |
| | | २३८ |

## हॉस्पिटल फंड व शिक्षण फंड मुंबई ऑफिसांत जमा–चेकने

दि. १–९–६६ ते ३१–१०–६६.

| | | |
|---|---|---|
| श्री. एस. वासुदेवराव | हैद्राबाद | ९५०–०० |
| ,, एस. सूर्यराव | यादगीरी | ५००–०० |
| श्री. मे. सीडले आईस फॅक्टरी | मुंबई | ३३५–३७ |
| श्री. एन्. जी. पटेल | नडोला | २००–०० |
| ,, रसिक शहा | मुंबई | १४१–०० |
| मे. अमेरिकन डेकोरेटर्स | | १३०–०० |
| डॉ. होमी ए. बाटलीवाला | मुंबई | ११०–०० |
| ,, व्ही. एन्. श्रॉफ | ,, | ५१–०० |
| श्री. एल. एन्. घीनींकर | दुर्गापूर | ५१–०० |
| श्री. एस्. एम्. राजमनाया, | लोलंबो | ४०–५० |
| डॉ. चंपा आफळे, | दिल्ली | २२–०० |
| श्री. व श्रीमती आर्. एच्. टिपनीस, | बल्ली | २२–०० |
| कु. शरयु तळपदे, | मुंबई | ११–०० |
| डॉ. एन्. डी. दाजी, | मुंबई | ५–०० |

**रोख जमा**

| | | |
|---|---|---|
| श्री. एम्. आर्. काळे, | माहीम | १८०–०० |
| श्री. व्ही. एस्. कामत, | सांताक्रुझ | १०१–०० |
| श्री. सी. आर्. राजगोपालन, | सायन | ५१–०० |
| मे. गोल्ड सोप कंपनी, | मुंबई | ३६–०० |
| श्री. एल्. आर्. पटेल, | यु. के. | २१–०० |
| श्रीमती पेरीन डी. सिधवा, | मुंबई | १५–०० |
| श्री. साईभक्त ( ५+५+५ ) | मुंबई | १५–०० |
| श्री. ओ. पी. शर्मा | मुंबई | १० |
| ,, टी. जी. पटेल | नांदेड | १० |
| ,, जी. आर्. भट | सांताक्रुझ | १० |
| श्रीमती इंदुमती ब. साघले | ,, | १० |
| श्री. बी. एन्. गुरुदास | सायन | १० आयु. |
| ,, एम्. एस्. डांगे | दादर | ५पी.ऑ. |
| ,, पी. एम्. डांगे | ,, | ५ |
| ,, डी. के. कालेकर | मुंबई | ५ |
| ,, एच. जे. पटेल | ,, | ५ |

### शिक्षण फंड

| | | |
|---|---|---|
| श्री. आर. बी. आटगर | मुंबई | १००१ |
| ,, जी. व्ही. व व्ही. एन्. श्रॉफ | | १०० |

# श्री ज्ञानदेवांचा अमृतानुभव

—गुरुदेव रानडे

**श्री ज्ञानेश्वरांनीं सुमारें सहाशें-सातशें वर्षांपूर्वीं 'अमृतानुभव' ह्या साक्षात्कारी महाग्रंथाची रचना केली. त्या ग्रंथराजाचें महात्म्य आम्हीं काय सांगावें? गुरुदेव रानडे हे साक्षात्कारी थोर पुरुष. त्यांनीं त्या सुंदर ग्रंथाचें केलेलें विश्लेषण वाचा.**

श्रीज्ञानदेवांनीं आपलें तत्त्वज्ञान इतक्या विलक्षण कल्पनाशक्तीच्या वैभवानें व प्रभुत्वानें प्रतिपादिलें आहे कीं, हा ग्रंथ मराठी वाङ्मयांत अद्यापि सर्वश्रेष्ठ तात्त्विक ग्रंथांतहि अग्रगण्य मानण्यांत येतो. श्रीज्ञानदेवांनीं या ग्रंथास 'अनुभवामृत' असें म्हटलें असलें, तरी 'अमृतानुभव' हा मथळा जास्त प्रचलित आहे. म्हणून आम्हीहि त्यास 'अमृतानुभव' म्हटलें आहे. या ग्रंथाची त्यांनीं स्वतः जी मुक्तकंठानें स्तुति केली आहे, त्यावरून हा ग्रंथ त्यांना किती मौलिक वाटत होता, हें स्पष्ट दिसतें. हा ग्रंथ आध्यात्मिक अनुभवानें श्रीमंत आहे, व याच्या सेवनानें जीव मुक्त व अमृत रूपच होतात, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. हा ग्रंथ इतका रसाळ व गोड आहे कीं, प्रत्यक्ष अमृतालाहि त्याच्या सेवनाची इच्छा व्हावी. मुक्ति चांगली खरी, परंतु अमृतानुभव अति शुद्ध आहे. या अनुभवामृतानें मुक्तिरूपी अमृतालाहि लाळ घोटावी लागते. श्रीज्ञानदेवांनीं हें अमृतानुभवाचें पक्वान्न सर्व जीवांना वांटून दिलें. या अमृतानुभवरूपी मेजवानीचा आनंद सर्व विश्वानें उपभोगावा हा हेतु आहे, असें ते सांगतात. बद्ध, मुमुक्षु व मुक्त या निरनिराळ्या योग्यतेच्या सर्व जीवांना हा ग्रंथ सारखाच उपयुक्त वाटेल, असें ज्ञानदेव म्हणतात. कारण वस्तुतः या विविध साधकांमध्यें फक्त अंशाचा फरक आहे, जातीचा नाहीं. बद्ध व मुमुक्षु यांच्यामध्यें बीजरूपानें पूर्णत्व व मुक्तस्थिति सूक्ष्मरूपानें वसत असतें. रोजच्या चंद्रापेक्षां पौर्णिमेचा चंद्र लोकदृष्ट्या निराळा आहे, हें खरें; परंतु, सूर्याच्या दृष्टीनें असें म्हणतां येईल काय? असें श्रीज्ञानदेव विचारतात. स्त्रीचें सौंदर्य तारुण्यांत तिच्या अंगांतच सहजच सामावून असतें; परंतु, प्रियकराचा समागम होतांच तें अंगांत न मावतां ओसंडू लागतें. त्याचप्रमाणें वसंत-समागम होतांच झाडें आपल्याच फांद्याफुलांनीं व पुष्पांनीं गगनचुंबित होऊन डोलूं लागतात. झाडांत बीजरूपाने प्रसुप्त असलेली शक्ति फल-पुष्परूपानें प्रगट होते. याप्रमाणेंच या ग्रंथांतलें अनुभवामृत चाखतां क्षणीं

विविध साधकांमधला भेद एकदम नष्ट होतो. या ग्रंथवाचनाचा परिणाम जीव–शिव–ऐक्य–घडवून आणण्यांत कसा होतो, हें ज्ञानदेवांनीं अनेक सुंदर व समर्पक दृष्टांत व रूपकांच्या सहाय्यानें विशद करून सांगितलें आहे. गंगेस मिळण्यास जाणारे सर्व प्रवाह गंगेस मिळाल्यावर गंगाच बनतात; सूर्यप्रकाशास भेटणारा अंधार स्वतःच सूर्यप्रकाशरूप होतो. जोंपर्यंत इतर धातू व परीसांचा संबंध घडला नाहीं, तोंपर्यंतच सोनें इतर धातूंपेक्षां निराळें आहे, असें आपण म्हणूं शकतों. कारण परीसाचा स्पर्श होतांच सर्व धातु सोनेंच बनतात.

## २. ग्रंथाचा मुख्य उद्देश

गुरूच्या अमर्याद औदार्यानें आपणांस मिळालेलें अध्यात्म–ज्ञान म्हणजे ईश्वराचें सानुभव ज्ञान जगांतील सर्व लोकांना द्यावें व त्याचा जगभर प्रसार करावा हाच या ग्रंथाचा प्रधान हेतु आहे, असें श्रीज्ञानदेव सांगतात. माझ्या सद्गुरूनें माझ्यावर कृपा करून मला जें आत्मज्ञान दिलें, तें केवळ मला एकट्याला आनंद मिळावा म्हणून नव्हे; तर सर्व जगास या ज्ञानानंदांत वांटेकरी होतां यावें या मुख्य हेतूनें त्यांनीं मला कृतार्थ केलें. सूर्यानें फक्त स्वतःसच प्रकाशित करावें या हेतूनें त्यास देवानें प्रकाश दिला नाहीं; तर सर्व जग प्रकाशित करावें हा ईश्वराचा हेतु आहे. चंद्रासहि त्याच्यासाठीं अमृत दिलें नाहीं किंवा केवळ ढगांसाठीं समुद्रानें त्यांना पाणी दिलें नाहीं. ज्योतीचा प्रकाश सर्वांसाठीं आहे. याप्रमाणेंच वसंत ऋतूंत सर्व झाडें फलपुष्पांनीं भरून जातात तीं सर्व लोकांना उपकृत करण्यासाठींच होय. येथें श्रीज्ञानदेव एक प्रकारचा अध्यात्म–सुखवाद प्रतिपादित आहेत असें दिसतें. यानें प्लेटोच्या ‘ लोकशाही ’ नामक ग्रंथांतील “ गुहा व त्यांतील ज्ञानी पुरुष ” या गोष्टीची आठवण होते. गुहेच्या बाहेर जाऊन ज्यानें खरा जगाचा प्रकाश अर्थात् अध्यात्म पाहिलें, त्या ज्ञानी पुरुषानें परत गुहेंत जावें व बाह्य जगाच्या सांवलीकडे पाहाणाऱ्या आपल्या सवंगड्यांना सांगावें कीं, ‘तुम्हीं पाहात असलेलें जग म्हणजे सांवली आहे, खरें जग नव्हे-’ हें त्यांना समजावून सांगावें. आपण कांहीं नवीन तत्त्व या ग्रंथांत प्रतिपादित नाहीं. कारण स्वयंप्रकाशी आत्मतत्त्वाचें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. आपण हा ग्रंथ न लिहितां स्वस्थ बसलो असतों, तरी हा स्वयंप्रकाशी आत्मा तळपत राहिलाच असता, असें श्रीज्ञानदेव अति नम्रतेनें सांगतात. ‘ प्रत्येक वस्तु स्वयंप्रकाशी आहे व प्रगट करून दाखवावें असें गुप्त किंवा गूढ असें जगांत कांहींच नाहीं. कारण एका पूर्ण, अविनाशी व सनातन आत्मतत्त्वानें हें जग पूर्णपणें भरलें आहे. तें गुप्तहि नाहीं व उघडहि नाहीं ’, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. अनादिकालापासून सतत राहणाऱ्या अद्वितीय चिद्रूपी वस्तूच्या पलीकडे कांहींच नाही. ती अवर्णनीय आहे व तिचें उपनिषदें देखील ‘ नेति, नेति’ असें

नकारात्मकच वर्णन करतात. म्हणून ' आपला ग्रंथ म्हणजे अत्यंत गंभीर अशा मौनाचें प्रदर्शन आहे; पाण्याच्या पृष्ठभागावर काढलेल्या मगरीच्या चित्राप्रमाणेंच आहे असें ' श्रीज्ञानदेव सांगतात. या श्रीज्ञानदेवांच्या उद्गारानें ' अंतिम तत्त्व शब्दांनीं विशद करणें अशक्य आहे ' हें स्पष्ट होतें. त्यावरून श्रीज्ञानदेवांची सहजसुलभ अत्यंत नम्रताही व्यक्त होते.

३. ग्रंथ–विवरण.

प्रथम या ग्रंथांत जें तात्त्विक विवेचन आहे, त्याचा विचार करूं. ग्रंथकारावर सांख्य–दर्शनाचा पगडा असल्यामुळें यांत प्रकृति–पुरुषांबद्दल विस्तृत ऊहापोह केला आहे. प्रकृति–पुरुषांचा पति पत्नीप्रमाणें संबंध आहे. त्यांच्यापासून हें सर्व विश्व निर्माण होतें. ते परस्परावलंबी आहेत. त्यांच्यापैकीं कोणाहि एकाचें सत्यस्वरूप ज्ञान झालें, कीं ते दोन्ही अदृश्य होतात. ब्रह्म या दोहोंना आधार आहे व ब्रह्म त्या दोहोंना आपल्याशीं एकरूप करतें. श्रीज्ञानदेवांवर वेदान्ताचाहि पगडा होता. त्यांनीं वेदान्ताच्या आधारें आत्म्याचें वर्णन केलें आहे. आत्मा अवर्णनीय व अव्यक्त आहे. शब्दा ( ओंकारा ) नें आत्मस्वरूपाचें ज्ञान होतें. अज्ञानामुळें त्याचा आम्हांस विसर पडतो. परंतु, या शब्दाचा आत्म्याच्या बाबतींत उपयोग होत नाहीं; कारण आत्मा स्वयंभू व सर्वज्ञ आहे. या शब्दाचा अज्ञान घालविण्याच्या कामींही उपयोग होत नाहीं. कारण अज्ञानास वस्तुतः अस्तित्वच नाहीं. यानंतर श्रीज्ञानदेवांनीं या ग्रंथांत ज्ञानाच्या व अज्ञानाच्या स्वरूपाबद्दल विस्तृत चर्चा केली आहे. ' अज्ञान सत्य आहे ' हा वाद श्रीज्ञानदेवांनीं मोठ्या कुशलतेनें खोडून काढला आहे. आत्मा ज्ञान व अज्ञान या दोहोंच्या पलीकडे आहे; ज्ञान व अज्ञान हीं दोन्ही खरी नाहींत. म्हणून त्यांना आत्मस्वरूपाची उपाधि म्हणणें रास्त होईल. या विश्वात एक चित्‌सत्–रूप तत्त्वाशिवाय कांहींहि अस्तित्वांत नाहीं. तेंच ब्रह्म किंवा आत्मा होय. सर्व विश्व म्हणजे या अद्वितीय ब्रह्माचें स्पंदन किंवा व्यक्त स्वरूप अथवा लीला होय. तें सर्व अस्तित्वाचा आधार आहे व त्यानेंच सर्व विश्व प्रकाशित झालें आहे. हेंच स्वयंप्रकाशी व स्वयंभू आत्मतत्व द्रष्टा, दृश्य व दर्शन, किंवा ज्ञाता, ज्ञेय व ज्ञाम या त्रिपुट्यात्मक जगाच्या रूपानें व्यक्त होतें; तरी तें या त्रिपुटींच्या पलीकडे असून त्यापासून अलिप्त असतें. यानंतर या ग्रंथांतील आध्यात्मिक अनुभवांचा विचार करूं. हा आत्मा गुरुकृपेनें व सूक्ष्म अतींद्रिय ज्ञानानें प्राप्त होतो, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. परमार्थांत सद्‌गुरूचें महत्त्व व त्याचें खरें स्वरूप हा तर इतर संतांप्रमाणें श्रीज्ञानदेवांचा चिरंतन आवडीचा विषय आहे. या विषयाच्या विस्तृत चर्चेस या ग्रंथांत फार मोठें स्थान दिलें आहे. शेवटीं, पराभक्तीचें स्वरूप काय व याच जन्मीं मुक्त झालेल्या संतांचीं लक्षणें कोणतीं, याचा थोडक्यांत विचार केला आहे.

## ४. सांख्य व वेदांताचा श्रीज्ञानदेवांच्या विचारांवर परिणाम.

प्रकृति-पुरुषांविषयीं विचार करूं लागलों, तर त्यांस श्रीज्ञानदेवांनीं शिव-शक्ति, देवोदेवी असेंहि म्हटलें आहे, हें प्रथम नमूद करणें जरूर आहे. या दोहोंमधील संबंध पति-पत्नीमधील संबंधाप्रमाणें आहे, असें श्रीज्ञानदेव प्रतिपादितात. यावरून श्रीज्ञानदेवांच्या विचारावर शैवदर्शनाचा व सांख्यांतील द्वैतवादाचा परिणाम झाला होता हें उघड दिसतें. पुरुषाची आत्मरतीची इच्छा म्हणजे प्रकृति होय. पुरुष व प्रकृति परस्परावलंबी कल्पना आहेत; तीं एकाच ब्रह्माचीं भिन्न रूपें असल्यामुळें, दोन्ही परमार्थतः एकरूप आहेत, असें श्रीज्ञानदेव प्रतिपादितात. श्रीज्ञानदेवांवर वेदान्ताचा परिणाम झाल्यामुळें प्रकृति-पुरुष या द्वैत तत्त्वांचा समन्वय ब्रह्मांत होतो, असा ते निष्कर्ष सांगतात. या ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायांत प्रकृति-पुरुषांच्या स्वरूपाविषयीं जी विस्तृत चर्चा श्रीज्ञानदेवांनीं केली आहे, ती सहज समजण्यास या प्रास्ताविक चर्चेचा उपयोग होईल असें आम्हांस वाटतें.

## ५ प्रकृति-पुरुष

प्रकृति-पुरुष किंवा शक्ति-शिव हे अनंत विश्वांचे जननी-जनक आहेत; त्यांच्यामध्यें तत्त्वतः पूर्ण ऐक्य आहे; त्यांच्यापैकीं कोणत्या एकाचा दुसऱ्याशीं संयोग झाला असतां, ते पूर्ण होतात हें कळणें फार कठीण आहे, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. ते अमर्याद आहेत त्यांचा पति-पत्नीप्रमाणें एकमेकांशीं संबंध आहे व पुरुषाला आत्मरतीची इच्छा झाली म्हणजे तोच प्रकृति बनतो. एकमेकांच्या उपभोगाची त्यांची इच्छा इतकी तीव्र असते कीं तीमुळें ते एकरूप होतात व जगांतील कोणत्याहि गोष्टीनें ही एकता ते बिघडूं देत नाहींत. त्यांचें परस्परांतील प्रेम इतकें तीव्र व गाढ असतें कीं, ते जणुं एकमेकांस गिळून टाकतात, असें वाटतें व हें सर्व जग म्हणजे त्यांची प्रेम-चेष्टा आहे असें ते भासवितात. प्रकृतीचा विलास-विस्तार वाढूं लागला कीं, पुरुष दिसेनासा होतो व पुरुषाचा विलास-विस्तार झाला कीं प्रकृति अदृश्य होते, असें श्रीज्ञानदेवांना प्रतिपादावयाचें आहे. या विश्वरूपी घरांत हीं दोघेंच राहतात. जेव्हां पतिराज ( पुरुष ) झोपी जातो, तेव्हां पत्नी ( प्रकृति ) जागी राहते व दोघांचें कुटुंबपणाचें कार्य करते. अकस्मात यांच्यापैकीं एखाद्यास जाग आली, तर सर्व घर गिळंकृत होतें व मागें कांहींच राहात नाहीं. पति जवळ निजला असतांना प्रकृति सर्व चराचर उत्पन्न करते. परंतु पुरुष जागा झाला कीं ती अदृश्य होते व त्याचा नवरेपणाहि नाहींसा होतो. एकमेकांचें रूप प्रतिबिंबित करणारे हे दोन आरसे आहेत व ते एकमेकांचे उपभोग्य विषय बनतात. परंतु एकमेकांची मिठी पडतांक्षणीं तींत दोघेंहि नाहींशी

होतात. याचा अर्थ असा कीं, त्यांच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान झालें म्हणजे तीं अंतिम सत्यें राहत नाहींत, तर त्यांना आधारभूत असलेल्या एकमेव ब्रह्माचीं तीं दृश्य वा व्यक्त रूपें बनतात. प्रकृति–पुरुष परास्परावलंबी व एकमेकास पोषक आहेत, असें श्रीज्ञानदेवांचें मत आहे. देवामुळें देवीला पूर्णत्व प्राप्त होतें व तिच्यामुळें देवाला देवपण लाभतें, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. पवित्र व पतिनिष्ठ प्रकृति स्वामीच्या सत्तेशिवाय जगूंच शकत नाहीं. आपल्या प्रियेशिवाय पुरुषास शिव ही संज्ञा प्राप्त होत नाहीं व सर्व कर्तृत्व व सर्व भोक्तृत्व येत नाहीं. हीं दोन तत्त्वें सापेक्ष असून तीं एकमेकांपासून निराळीं व स्वतंत्र राहूं शकत नाहींत. निरतिशय प्रेमामुळें त्यांना अत्यंत सूक्ष्म परमाणूंतहि आनंदानें नांदतां येतें; एवढेंच नव्हे, तर एवढें मोठें विश्व त्यांना राहण्यास अगदीं तोकडें वाटतें. ते एकमेकास एकमेकांचा प्राण समजतात व दोघांच्या साहाय्याशिवाय जगांतील अत्यंत क्षुद्र वस्तूदेखील निर्माण होऊं शकत नाहीं. आपल्या निराकार पतिराजांना लाजून ती त्यांना नामरूपात्मक अलंकारांनीं सजविते. हे अलंकार जगाएवढे मोठे आहेत. ज्या ब्रह्माच्या बाबतींत ऐक्याची देखील कल्पना असह्य ठरते, त्या ब्रह्मामध्यें प्रकृति आपल्या अद्‌भुत सामर्थ्यानें या जगांतील वैविध्य व वैभव निर्माण करतें. पुरुष स्वतः आकुंचन पावून आपल्या प्रिय पत्नीची वाढ जोरानें होण्यास मदत करतो; कारण तिनें प्रगट केलेल्या सर्व वस्तूंत पुरुषाचेंच अस्तित्व भासतें. तिच्यावरील प्रेमामुळें तो द्रष्टा, साक्षी राहतो. ती दिसेनाशी झाली कीं तो दुःखानें धाडकन् पडतो. तिच्या विनवणीमुळें तो जगाचें रूप धारण करितो, ती नसली कीं तिनें निर्माण केलेलें नाम-रूपात्मक पांघरुण नाहींसें झाल्यामुळें तो उघडा पडतो. 'प्रकृति प्रगट किंवा व्यक्त झाली कीं पुरुष गुप्त होतो, व पुरुषाचें खरें ज्ञान झालें कीं, प्रकृति अदृश्य होते' ही श्रीज्ञानदेवांची आवडती कल्पनाच येथें स्पष्टपणें मांडली आहे. येथें एंपिडोक्लीज नामक ग्रीक तत्त्वज्ञान्याची आठवण होते. त्याच्या तत्त्वाप्रमाणें 'प्रेम' व 'कलह' हीं दोन तत्त्वें एकमेकांस हुसकून ब्रह्मांडांत प्रवेश करतात. प्रकृति किंवा पुरुष यांपैकीं एकाचें खरें ज्ञान झालें कीं, या दोन्ही कल्पना सापेक्ष आहेत व या दोहोंना आधारभूत असें तत्त्व म्हणजे ब्रह्म होय. हे तत्त्व श्रीज्ञानदेवांनीं विस्तारानें मांडलें आहे.

( पुढें चालू )



# सद्‌गुरुचा झाला प्रसाद

सद्‌गुरूचा झाला प्रसाद, साईंचा झाला प्रसाद ।
आम्हीं गातों त्याचे पडसाद ।
सप्तसुरांतुनी सप्तऋषींचे द्या हो आशीर्वाद ॥

आम्हीं रंगूं रामरंगांत
आम्हीं रंगूं साइनामांत
आनंद रोमरोमांत
तो अमृतमय मंगल नाद
आम्हीं गातों त्याचे पडसाद ॥

संगीत पूजा अर्चना
संगीत ही उपासना
संगीत एक साधना
संगीत ही आराधना
स्वर-महिमा थोर अगाध ॥

कवि–पांडुरंग दीक्षित

# बाबांनीं बायजाबाईस दिलेले नऊ रुपये

संपादक **साईलीला** यांना,

स. न. वि. वि.

प्रथम मी ज्यावळीं शिरडीस समाधी दर्शनास गेलो त्यावेळीं कै. बायजाबाई शिंदे हयात होत्या. बाबांनीं दिलेले नऊ रुपये एका काचेच्या फ्रेममध्यें ठेवलेलें होते. ती फ्रेम मी पाहिली. पण त्या नऊ रुपयांचा अर्थ मला उमजला नाहीं. बहुधा '**नवविधा भक्ती**'चे ते रुपक असावे असा मी मनाशीं तर्क केला. पण परवांच्या १० सप्टेंबर १९६६ च्या '**साप्ताहिक स्वराज्यां**'त, '**अग्निमहापुराणांत**' ब्रह्मदेवांनीं जी नऊ प्रकारची सृष्टी निर्माण केली आहे, त्याचा सविस्तर उल्लेख आला आहे, त्यावरून ब्रह्मनिर्मित अशा नवविध सृष्टीवर बाबांचे नियंत्रण असते, याचें प्रतिक म्हणून ते रुपये दिले असावेत असें मला वाटतें. शिवाय त्याच लेखांत अष्टांगयोगाची व नववी प्रार्थना अशा नवविध भक्तीचीहि माहिती दिली आहे. यावरून बाबांच्या नऊ रुपयांचा उलगडा होतो. साईलीलेच्या वाचकांनीं सदर तारखेचा अंक अवश्य वाचावा. म्हणजे त्यांना ही माहिती योग्य प्रकारें समजेल. बाबांनीं आपल्या महाप्रयाणाचेवेळीं दिलेल्या त्या नऊ रुपयांना विशिष्ट अर्थ असला पाहिजे असें मला वाटत होते. बाबांनीं आपल्या हयातींत अनेक भक्तांना अमाप धन दिलें, पण समाधीचेवेळीं फक्त ९ रुपयेच त्यांच्याकडे होते. ते नऊ रुपये म्हणजे ही नवविधा सृष्टी व भक्तांच्या ठाई असलेली नवविधा भक्ति होय. ही बाबांच्या कृपेनें पावन झालेली अमोल दौलत भक्तांसाठीं मागें ठेवून बाबांनीं महाप्रयाण केलें. त्या नऊ रुपयांच्या रूपानें बाबा आपल्यांत ( या नश्वर जगांत ) अजून आहेत, असें खात्रीनें समजावें. साईभक्तांनीं माझ्या या अनुभवाचा जरूर विचार करावा.

—बा. भा. मगदुम



# ही बाबांची कृपा

श्री. महादेव दामोदर सहस्रबुद्धे, गंगाराम खत्री वाडी, ठाकुरद्वार पोष्टामार्गे, मुंबई नं. २ हे लिहितात कीं—

"मी माझे मामाबरोबर सन १९१६ सालीं श्रीसाईबाबांचे दर्शनाला गेलो होतों त्यावेळीं माझ्या मामाला वकिलीची परीक्षा पास होईन का? हा प्रश्न विचारावयाचा होता. त्यावर श्रीसाईबाबांनी उदी दिली व 'अल्ला मालिक' एवढेंच म्हणाले. पुढें मी नोकरींत असल्यामुळें कांहीं वर्षे मला बाबांना भेटण्याचा योग आला नाहीं, परंतु मी जेव्हां निवृत्त झालों त्यावेळीं मला मिळालेल्या रोख्यातून फंड ग्राच्युइटि वगैरेची रक्कम आजारपण, मुलांचे शिक्षण, मुलीचें लग्न, यांत खर्च झाली व थोडीफार रक्कम विश्रांती म्हणून घरीं बसून खर्च केली. पुढें संसाराचा गाडा कसा चालवावा, या विचारांत पडलों व सन १९५० सालीं बाबांचे दर्शनाला गेलों व प्रार्थना केली कीं, "बाबा, माझे नोकरीची व्यवस्था करा." त्याप्रमाणें मला ताबडतोब नोकरी मिळाली. आज बाबांचे कृपेनें मी जुनी नोकरी सोडून माझे कांहीं स्नेही मंडळींनीं मला पार्ट टाईम नोकरी दिली. मी आज कामा नॉर्टन कंपनीमध्यें नोकरी करीत असून मला चांगला पगार मिळतो. बाबांचे कृपेनें सर्व जण माझ्यावर प्रेम करतात, ही केवळ श्रीसाईबाबांची कृपा. मी शिरडीची वारी १९५० सालापासून करीत आलों. त्यांत खंड पडला नाहीं व बाबांचे कृपेनें पुढेंही पडणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. केवळ श्रद्धा व सबुरी यामुळें मला आज अन्नवस्त्राला कमी नाहीं."

---


## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह (स्टँप–तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

# उदीचा प्रताप

श्री. सुरेश वा. पिल्ले मु. चालबर्डी ता. केळापूर जि. यवतमाळ हे लिहितात कीं आमच्या घरीं एक कुत्रा होता. तो आमच्या सर्वांच्याच आवडीचा होता. घरीं सर्वांना गुरुवारीं उपवास असे. ह्याचप्रमाणें हा आमचा कुत्राही उपवास करी, अन्नाला शिवत सुद्धा नसे! एके दिवशी म्युनिसीपालटीने गांवांतील कुत्र्यांना विष देण्यास सुरवात केली, आम्हाला बातमी कळताच आम्ही घरीं कुत्र्याला बांधून ठेवले. पण त्यानेही हातावर तुरी देऊन थोड्या वेळाने आपली सुटका करून घेऊन तो बाहेर पडला. आमचें त्याच्याकडे लक्षच नव्हते. नेमकी जी गोष्ट नको व्हायला पाहिजे होती ती झाली. तो विष खाऊन घरासमोर हातपाय झाडतांना दृष्टीस पडला. सर्वांना वाईट वाटूं लागलें. त्याला ताक पाजण्यांत आलें. पाणी पाजण्यांत आलें. त्यांचीं लक्षणें कांहीं योग्य दिसत नव्हती. तोंच माझा ११ वर्षांचा भाऊ साईबाबांच्या फोटोला उदबत्ती लावून त्याची उदी आणून कुत्र्याच्या डोक्याला लावली तोंच पांच-दहा मिनिटांनीं कुत्रा शुद्धीवर येऊं लागला व एका तासांत तो संपूर्ण बरा झाला. आम्ही सर्व आश्चर्यांत पडलों. काय हा महिमा उदीचा!

त्यावेळेपासून घरांत कोणाला कांहीं झालें तरी उदबत्ती लावून उदी डोक्याला लावून घेतात. हेंच आमचें औषध सुरूं झालें.

साईंची लीला अपार।

दुःखांत उदीचा आधार॥



**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित**

**व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) **Glimpes of Indian Spirituality**– by Pradhan | | | १-०० |
| (७) **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १–०० |
| (८) **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) **साईबावा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. घोंड | २–०० |
| (१०) **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१५) **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१६) **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१७) **Guide to Shirdi** (English) | | | ००–१२ |
| (१८) **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | | **00–37** |
| (2) ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | | **00–50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहि
माणसाला मंत्रमुग्ध कर
त्याचप्रमाणें कुठल्या
हृदयंगम चित्राची मुद्रणकु
वाचकाला नयनमुग्ध करतें

★

आणि म्हणून च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँढहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड